


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO.MAHMAR/2020/79996

सांगली आवृत्ती

▪ मुंबई ▪ पुणे ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ सोलापूर ▪ अहिल्यानगर

हॅलो प्रभात LIVE

Hello Prabhat Media

Print - Electronic - Social

▪ वर्ष : ०७ ▪ अंक : ४३ ▪ मंगळवार, २६ मे २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४+२



## भाड्याने देणे

ऑफिससाठी उपयुक्त असा २५० स्के.फू.ब्लॉक भाड्याने देणे आहे.

•इंडोशिवा ॲसेट•

दुसरा मजला,गणपती मंदिरसमोर विश्रामबाग,सांगली.

संपर्क

7517219001
9011889001


# संजयकाकांना भाजपचा गळ ?

# ‘ऑपरेशन लोटस’ची चर्चा रंगली

## महामंडळ नियुक्तीच्या आमिषातून राजकीय समीकरणे बदलण्याचे संकेत ; २६ मतदार ठरू शकतात निर्णायक

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली - सातारा विधान परिषद निवडणूक पार्श्वभूमीवर संजयकाका समर्थक तासगाव नगरपालिकेतील तेरा नगरसेवक, पंचायत समितीचे एक सदस्य (सभापती), जिल्हा परिषदेचे दोन सदस्य, कवठेमहांकाळ पालिकेतील दहा सदस्य, असा २६ मतदारांचा फौज फाटा घेऊन माजी खासदार संजयकाका पाटील यांनी पुन्हा भाजपबरोबर जाण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याशी नुकत्याच झालेल्या गुप्तगुवरून राजकीय अंदाज काढले जात आहेत. महामंडळाचे गाजर दाखवून भाजपने काकांच्या कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी ऊर्जा दिली आहे , त्या पार्श्वभूमीवर संजयकाकांकडे असलेल्या २६ मतदारांसाठी भाजपने महामंडळाचे गाजर त्यांना दाखविले आहे का? असाही प्रश्न विचारला जात आहे, तर भाजपात जाण्यासाठी माजी खासदार संजयकाका पाटील यांची धडपड सुरू आहे का? असाही मुद्दा उपस्थित होत आहे.

नुकत्याच झालेल्या नऊ विधान परिषद निवडणुकीच्यावेळी संजयकाकांनी टाकलेला डाव यशस्वी झाला नसला तरी संजयकाका पाटील यांनी जिद्द न सोडता भाजप प्रवेशासाठी हालचाली सुरूच ठेवल्या असल्याची चर्चा राजकीय जाणकारांत केली जात आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषदेवर होणाऱ्या निवडणुकीपूर्वी या निवडणुकांनंतर राज्यातील महामंडळाची नियुक्ती करण्यात येणार असल्याची घोषणा करून भारतीय जनता पक्षाने नेत्यांना गाजर दाखवून कामास लावले आहे.

सांगली - सातारा स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी ८५३ मतदार असून भाजपकडे केवळ ३१६ मतदार आहेत. अद्याप भाजपला १११ मतांची गरज आहे . छोट्या आघाडी व अपक्ष सदस्यांची संख्या तीस आहे, या पार्श्वभूमीवर 'ऑपरेशन लोटस' राबविण्यात येते का? याचीही चाचपणी भाजप नेत्यांकडून केली जात आहे. संजयकाका पाटील यांच्याकडे असलेली २६ मतदारांची संख्या अत्यंत महत्वपूर्ण आहे, सांगली जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीच्यावेळी संजयकाकांनी महाविकास आघाडीला सोडचिट्टी देऊन भाजपमागे उभे राहण्याचा निर्णय घेतला. विधान परिषदेला उमेदवारी मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती , परंतु ती फोल ठरली, त्यामुळे महाविकास आघाडी नाही आणि महायुतीही नाही अशा अधांतरी स्थितीत सध्यातरी संजयकाका आहेत.

काही दिवसांपूर्वी संजयकाका पाटील यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली, विधानपरिषदेसाठी पाठिंबा मिळावा यासाठी त्यांना महामंडळाचे गाजर दाखवण्यात आले, की भाजप प्रवेश व्हावा त्यापोटी पाठिंबा देण्यासाठी संजयकाका तयार आहेत, याबाबत उलट सुलट अंदाज राजकीय जाणकारांमधून व्यक्त होत आहेत.

राजकारणात तातडीचे निर्णय धोकादायक असतात, निर्णयाला वैचारिक दृष्टिकोनाची आणि दूरदृष्टीची झालर असावी लागते, आता स्थानिक स्वराज्य संस्थेतून विधान परिषदेवर निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे, बहुमत कुणालाच नसले तरी मोठा पक्ष भारतीय जनता पक्ष आहे. आणि या पक्षाच्या नेत्यांच्या हातात 'ऑपरेशन लोटस' सारखे हत्यार आहे. स्वबळावर ही निवडणूक व्हावी असे जरी भाजप नेत्यांना मनातून कितीही वाटत असले तरी तसे होणार नाही. त्या दृष्टिकोनातूनच महामंडळाचे गाजर दाखवत संजयकाकांना भाजपकडून गळ टाकण्यात आला असावा असाही अंदाज व्यक्त होत आहे.

भविष्यातील राजकारणाचा विचार न करता घाईगडबडीने संजयकाका जो निर्णय घेत असतात त्यामुळे त्यांना तोंडघशी पडावे लागते, अशी चर्चा सुरू आहे. राज्यातील निवडणुका जवळजवळ पूर्ण होत आल्या आहेत, आता केवळ महामंडळाच्या निवडी होणे बाकी आहे, अशा स्थितीत संजयकाका यांनी सावधपणे पावले टाकावीत अशी भावना त्यांच्या हितचिंतकांमधून व्यक्त होत आहे. भाजप प्रवेशाच्या दृष्टिकोनातून संजयकाकांनी पुढाकार घेतला असला तरी निवडणूक निकालानंतर त्यांच्या पदरात काय पडले हे दिसून येईल असेही जाणकारांतून बोलले जात आहे.

# करवाढीविरोधात व्यापाऱ्यांचा संताप

**बहिष्काराचा इशारा**

**सांगली : हॅलो प्रभात**

महानगर पालिकेकडून घरपट्टीमध्ये दुप्पट-तिप्पट करवाढ करून नागरिक व व्यापाऱ्यांना पाठविण्यात आलेल्या बिलांविरोधात व्यापारी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मूलभूत सुविधांचा अभाव असतानाही नागरिकांवर जाणीवपूर्वक करवाढ लादण्यात येत असल्याचा आरोप व्यापारी एकता असोसिएशन व मिरज व्यापारी असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आला आहे. महापालिका क्षेत्रात रस्ते, पाणी, स्वच्छता यांसारख्या प्राथमिक सुविधा अपुऱ्या असताना करवाढ करणे अन्यायकारक असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

यापूर्वीही अशाच प्रकारची करवाढ लादण्यात आली होती. मात्र नागरिकांच्या विरोधामुळे प्रशासनाला ती मागे घ्यावी लागली होती. यावेळीही नागरिक व व्यापारी एकत्रितपणे आंदोलन उभारतील, असा इशारा संघटनांनी दिला आहे.

सध्या महागाईमुळे सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले असताना इंधनदरवाढ, वाढती जीवनावश्यक वस्तूंची महागाई आणि आर्थिक अडचणी यामुळे नागरिक त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत प्रशासनाकडून जबरदस्तीने करवसुली करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रश्नावर सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन करवाढ स्थगित करावी, अशी मागणी व्यापारी संघटनांनी केली आहे. आमदार व खासदारांनी यामध्ये हस्तक्षेप करून जनतेला दिलासा द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने संवेदनशील भूमिका घेतली नाही तर व्यापक व्यापारी मेळावा घेऊन करवाढीवर बहिष्कार टाकण्याची भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा संघटनांनी दिला आहे.

## संक्षिप्त

### कोल्हापूरच्या सातजणांनी केले एव्हरेस्ट सर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूरच्या 'करवीर हायकर्स' च्या सातजणांनी अत्यंत प्रतिकूल हवामानात आणि खडतर अशी समुद्र सपाटीपासून ५३६४ मीटर उंचीवर पोहचत 'एव्हरेस्ट बेस कँप' मोहीम यशस्वी केली. रत्नागिरीचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते, त्यांच्या पत्नी डॉ. सुप्रिया यांचा यात समावेश आहे. वयाच्या २१ व्या वर्षी एव्हरेस्ट सर करणाऱ्या आणि जगातील मृत्यूचा पर्वत अशी ओळख असणाऱ्या 'अन्नपूर्णा' पर्वत सर करणाऱ्या जगातील सर्वात तरुण ठरलेल्या करवीर हायकर्सच्या कस्तुरी सावेकर यांच्या मार्गदर्शन आणि नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली.

### दिल्लीतील वायू प्रदूषणावर आता 'कोल्हापुरी' उपाय

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गेल्या अनेक वर्षांपासून दिल्लीसाठी डोकेदुखी ठरलेल्या महाभयंकर हवा प्रदूषणावर मात करण्यासाठी आता कोल्हापुरी पॅटर्न मैदानात उतरला आहे. कोल्हापूरच्या सुमीत संतोष पोवार आणि प्रतिराज तानाजी कुंभार या तरुणांच्या कल्पकतेतून साकारलेले पवन तीन हे यंत्र आता दिल्लीची हवा शुद्ध करण्यासाठी सज्ज झाले आहे. ते दिल्लीतील मायापुरी येथील सद्गुरू रामसिंह मार्गावर प्रायोगिक तत्त्वावर बसवण्यात आले आहे.

## अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील गोंधळामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक त्रस्त

**सांगली : हॅलो प्रभात**

राज्यातील इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये यंदा मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण झाल्याने सांगली जिल्ह्यात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यानंतर तत्काळ शून्य प्रवेश फेरी राबविण्यात आल्याने विद्यार्थ्यांसमोर अनेक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. सध्या जिल्ह्यात उष्णतेची तीव्र लाट असून तापमान ३५ ते ३८ अंशांच्या पुढे गेले आहे. अशा परिस्थितीत प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना व पालकांना वारंवार महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळेही विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. वेबसाइट स्लो होणे, ओटीपी न मिळणे, कागदपत्रे अपलोड करताना त्रुटी येणे तसेच सर्व्हर डाऊन होण्याच्या समस्या वारंवार उद्भवत असल्याने प्रवेश प्रक्रिया त्रासदायक ठरत असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

या संपूर्ण प्रक्रियेवर सांगली जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटना यांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संघटनेचे अध्यक्ष प्रा. सुरेश भिसे यांनी शिक्षकांवर सातत्याने विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या टाकल्या जात असल्याची खंत व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या हातात मूळ कागदपत्रे येण्यापूर्वी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात कोणताही अर्थ नसल्याचे त्यांनी सांगितले.

संघटनेचे सचिव प्रा. दिलीप जाधव यांनी राखीव प्रवर्गांसाठी नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र अनिवार्य केल्याने ग्रामीण भागातील पालकांची गैरसोय वाढल्याचे सांगितले. प्रवेश प्रक्रिया सुलभ करावी आणि वेळापत्रकात आवश्यक बदल करावेत, अशी मागणी संघटनेने शासनाकडे केली आहे.

## 'डी.वाय.पाटील'च्या विद्यार्थ्याची स्नेइडर इलेक्ट्रिकमध्ये निवड

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

येथील डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षात शिकणारा ओंकार चोडणकर या विद्यार्थ्यांची स्नेइडर इलेक्ट्रिक बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये निवड झाली आहे.

कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हद्वारे ही निवड झाली आहे.या प्रक्रियेमध्ये देशभरातील सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ३ राज्यांमधून केवळ १२ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली असून पश्चिम महाराष्ट्रमधून निवड होणारा ओंकार हा एकमेव विद्यार्थी आहे. त्याला ५ लाख ५० हजार रुपये वार्षिक पॅकेज मिळाले आहे. निवड प्रक्रियेमध्ये ग्रुप डिस्कशन, टेक्निकल



**यश मिळवणारा पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव विद्यार्थी**

राउंड, मॅनेजेरियल राउंड आणि एचआर राउंड अशा चार टप्प्यांचा समावेश होता. उत्कृष्ट तांत्रिक ज्ञान, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर ओंकारने हे यश संपादन केले. महाविद्यालयाचे कॅम्पस संचालक डॉ. अभिजीत माने म्हणाले, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या प्लेसमेंटवर विशेष लक्ष केंद्रित केले जाते. विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश माने म्हणाले, नवीन शैक्षणिक पद्धतीमध्ये प्रात्याक्षिकावर भर देण्यात आला आहे. त्याचबरोबर मुलाखतीसाठी विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येते याचा उपयोग विद्यार्थ्यांची निवड होण्यास उपयुक्त ठरते. कॅम्पस संचालक डॉ. अभिजीत माने, प्राचार्य डॉ. सुरेश माने, प्रशासकीय अधिकारी सुयोग पाटील, विभागप्रमुख डॉ. विद्या अब्दुलपूरकर, टीपीओ प्रिती भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. ओंकारच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, तेजस पाटील आणि देवश्री पाटील यांनी त्याचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

# सांगलीतील 'उमेद मॉल' पहिल्याच टप्प्यात समाविष्ट करा

**मुंबई : हॅलो प्रभात**

सांगली जिल्ह्यात मंजूर असलेल्या 'उमेद मॉल' प्रकल्पाचा पहिल्याच टप्प्यात समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी सांगली विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुधीर गाडगीळ यांनी मुंबई येथे राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन दिले.

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी 'उमेद मॉल' प्रकल्प राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सांगली जिल्ह्यासाठी देखील 'उमेद मॉल' मंजूर झाला असून, सध्या त्याच्या प्राक्कलनाचे (अंदाजित पत्रक) काम प्रगतीपथावर आहे. मात्र, पहिल्या टप्प्यातील अंमलबजावणीमध्ये सांगली जिल्ह्याचा समावेश करण्यात आलेला नाही, ही बाब आमदार सुधीर गाडगीळ यांनी ग्रामविकास मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली आणि सांगलीला पहिल्या टप्प्यातच प्राधान्य देण्याची आग्रही मागणी केली.

आ. गाडगीळ म्हणाले की, सांगली जिल्ह्यात महिला बचत गटांच्या माध्यमातून अत्यंत दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण उत्पादने तयार केली जातात. ग्रामीण व निमशहरी भागातील या महिलांना त्यांच्या कष्टाला योग्य भाव मिळणे, उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणे आणि महिलांना



**▶▶ आ.सुधीर गाडगीळ यांची मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मागणी**

आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनवण्यासाठी सांगलीत 'उमेद मॉल' उभारणे अत्यंत आवश्यक आहे. पुढे बोलताना त्यांनी नमूद केले की, सांगली जिल्हा हा आधीच व्यापारी आणि कृषी क्षेत्रात अग्रेसर व प्रगत जिल्हा आहे. अशा ठिकाणी 'उमेद मॉल' तातडीने कार्यान्वित झाल्यास महिला बचत गटांच्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळेल आणि स्थानिक पातळीवर रोजगाराच्या व विक्रीच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील.

आ.सुधीर गाडगीळ यांनी मांडलेली बाजू आणि सांगली जिल्ह्याचे व्यापारी महत्त्व लक्षात घेऊन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी या मागणीवर सकारात्मकता दर्शविली. सांगलीच्या 'उमेद मॉल'चा पहिल्या टप्प्यात समावेश करण्याबाबत संबंधित विभागाला तातडीने आवश्यक त्या सूचना दिल्या जातील, असे आश्वासन मंत्री गोरे यांनी दिले.

# बकरी ईदनिमित्त पाणीपुरवठा व स्वच्छता मोहीम राबवा

## सकल मुस्लिम युवक संघटनेची मागणी

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा तसेच घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी सकल मुस्लिम युवक संघटना यांच्या वतीने ईश्वरपूर नगरपरिषदेकडे करण्यात आली आहे. याबाबत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील यांना निवेदन देण्यात आले. पश्चिम महाराष्ट्र संघटक मकसूद भादी, जिल्हाध्यक्ष अमीर हवलदार आणि तालुकाध्यक्ष तनवीर संदे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात मोमीन मोहल्ला, अकबर मोहल्ला, मणेर गल्ली, सावकार मशीद



परिसर तसेच शहरातील इतर भागांत स्वच्छता मोहीम राबवावी, ईदगाह मैदान व दफनभूमीत औषध फवारणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच वेस्टेज कचऱ्यासाठी ठिकठिकाणी कचरा गाड्यांची व्यवस्था करावी आणि बकरी ईदच्या दिवशी पाणीपुरवठा अधिक वेळ सुरळीत ठेवावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. यावेळी मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील तसेच आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी घरोघरी वेस्टेज बॅग उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी मुदसर पठाण, शरीफ शिकलगार, साद दिवाण यांच्यासह संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### मान्सूनपूर्व पाऊस पडला; उन्हाचे चटके कायम

**सोलापूर : हॅलो प्रभात**



मे महिना संपत आला तरी उन्हाचे चटके सुरूच आहेत. दिवसभर ४० अंश सेल्सिअस तापमान नोंदल्यानंतर रात्री वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला, परंतु दुसऱ्या दिवशी रविवारी दि. २४ मे रोजी उन्हाचे चटके मात्र कायम होते. ३९.८ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदले गेले.

# 'शरद इन्स्टिट्यूट'च्या १० विद्यार्थ्यांची टेकफिनिक्स कंपनीत निवड

**यड्राव : हॅलो प्रभात**

येथील शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील दहा विद्यार्थ्यांची नामांकित टेकफिनिक्स प्रा. लि. कंपनीमध्ये निवड झाली आहे. महाविद्यालयातील मेकॅनिकल व सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी या कॅम्पस मुलाखतीत यश संपादन केले. मेकॅनिकल विभागातील वैभव झडगे, आसावरी माने, निलेश कोरे, स्वरुपा मगदूम, केदार कुलकर्णी, ओमकार सातपुते, अनिरुद्ध परिट, अरमानअल्ली फनिबंद तसेच सिव्हिल विभागातील अभिषेक धनवडे आणि मयुरेश पाटील यांची निवड झाली आहे.

ऑईल अँड गॅस, पेट्रोकेमिकल, फार्मास्युटिकल, फर्टिलायझर, पॉवर जनरेशन आणि वॉटर इंडस्ट्री क्षेत्रासाठी इंजिनिअरिंग डिझाईन व कन्सल्टन्सी सेवा पुरविणारी ही कंपनी असून तिचे मुख्यालय मुंबई येथे आहे. महाविद्यालयात ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट सेलमार्फत विद्यार्थ्यांना ग्रुप डिस्कशन, इंटरव्ह्यू टेक्निक्स, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, इंटरपर्सनल स्किल्स तसेच मॉक इंटरव्ह्यूचे प्रशिक्षण देण्यात आले होते. कंपनी पूरक प्रशिक्षणाचाही विद्यार्थ्यांना लाभ झाला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी अभिनंदन केले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ.बी.बी.संगमे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.




# जगाला युद्ध नव्हे, तर शांततेची गरज

आज जग विज्ञान, तंत्रज्ञान आणि विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचले असले, तरी मानवजातीसमोर उभे असलेले सर्वांत गंभीर आव्हान म्हणजे दहशतवाद आणि हिंसाचार होय. केवळ भारतच नव्हे, तर अमेरिका, फ्रान्स, रशिया, इस्रायल, अफगाणिस्तान, श्रीलंका अशा अनेक देशांनी दहशतवादाची भीषण झळ सोसली आहे.

डिजिटल युगात दहशतवादाचे स्वरूप अधिक धोकादायक झाले आहे. इंटरनेट, सोशल मीडिया आणि सायबर नेटवर्कच्या माध्यमातून जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात बसून अफवा पसरवणे, द्वेष निर्माण करणे किंवा हिंसक कारवाया घडवून आणणे शक्य झाले आहे. त्यामुळे दहशतवाद हा आता केवळ एका देशाचा प्रश्न राहिलेला नसून संपूर्ण मानवजातीच्या अस्तित्वाला आव्हान देणारे जागतिक संकट बनले आहे.

भारतासाठी दहशतवाद ही नवी समस्या नाही. गेल्या अनेक दशकांपासून देशाने विविध प्रकारच्या दहशतवादी कारवायांचा सामना केला आहे. २१ मे १९९१ रोजी तमिळनाडूतील श्रीपेरंबुदूर येथे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची आत्मघाती बॉम्बहल्ल्यात हत्या झाली आणि संपूर्ण देश हादरून गेला. त्या दुर्दैवी घटनेनंतर भारत सरकारने २१ मे हा दिवस 'दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन' म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला. हा दिवस केवळ स्मरणाचा नाही, तर समाजात शांतता, बंधुता आणि अहिंसेचे मूल्य रुजवण्याचा संदेश देणारा आहे.

भारताने पंजाबमधील खलिस्तानवादी चळवळ, जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद, ईशान्येकडील फुटीरतावाद, नक्षलवाद तसेच महानगरांतील बॉम्बस्फोट अशा अनेक स्वरूपातील हिंसाचार अनुभवला आहे. १९९३ चे मुंबई बॉम्बस्फोट, २००१ मधील संसदेवरील हल्ला, २६/११ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला आणि पुलवामा हल्ला या घटनांनी देशाच्या सामूहिक मानसिकतेवर खोल जखमा केल्या. या हल्ल्यांमध्ये शेकडो निरपराध नागरिक, पोलीस आणि जवान शहीद झाले. दहशतवादाचा उद्देश केवळ जीवितहानी घडवणे नसतो; तर समाजात भीती, अविश्वास आणि अस्थिरता निर्माण करणे हाच त्यामागील मुख्य हेतू असतो.

मानवजातीच्या इतिहासावर नजर टाकली, तर युद्धे, संघर्ष आणि हिंसा यांचे अनेक संदर्भ दिसतात. प्राचीन काळात भूभाग विस्तारासाठी युद्धे झाली; मध्ययुगात धर्माच्या नावाखाली रक्तपात झाला; तर आधुनिक काळात धार्मिक कट्टरता, आर्थिक विषमता, राजकीय स्वार्थ, जातीयवाद आणि राष्ट्रवादाच्या अतिरेकामुळे हिंसेला खतपाणी मिळाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रगतीची दारे खुली केली, पण त्याच तंत्रज्ञानाचा वापर आज दहशतवादी संघटना विनाशासाठी करत आहेत. अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, आर्थिक नेटवर्क, एन्क्रिप्टेड संवादव्यवस्था आणि सोशल मीडिया यांच्या मदतीने दहशतवाद अधिक संघटित व आक्रमक झाला आहे.

दहशतवादाची कारणे अनेक आहेत. गरिबी, बेरोजगारी, अशिक्षितता, सामाजिक अन्याय, धार्मिक कट्टरता, राजकीय अस्थिरता आणि परकीय हस्तक्षेप ही त्यामागील प्रमुख कारणे मानली जातात. समाजातील काही युवक जेव्हा स्वतःला उपेक्षित समजू लागतात, तेव्हा त्यांच्या मनात असंतोष निर्माण होतो. काही अतिरेकी संघटना या असंतोषाचा फायदा घेत युवकांचे ब्रेनवॉश करतात. धर्म, स्वातंत्र्य किंवा राष्ट्रवादाच्या नावाखाली त्यांना हिंसेच्या मार्गावर ढकलले जाते. काही वेळा आर्थिक आमिषही दाखवले जाते. डिजिटल माध्यमांमुळे ही प्रक्रिया अधिक वेगाने घडू लागली आहे. सोशल मीडियावरील द्वेषपूर्ण प्रचार, खोटी माहिती आणि धार्मिक तेढ निर्माण करणारे संदेश समाजात विष पेरण्याचे काम करतात.

आज सायबर दहशतवाद हे नवे आणि गंभीर संकट बनले आहे. सरकारी यंत्रणा, बँकिंग व्यवस्था, संप्रेषण प्रणाली आणि संरक्षण क्षेत्रावर डिजिटल हल्ले करण्याची क्षमता दहशतवादी संघटनांनी विकसित केली आहे. काही वेळा सोशल मीडियावरील अफवांमुळे दंगली आणि हिंसाचार उसळल्याची उदाहरणे समोर आली आहेत. त्यामुळे डिजिटल साक्षरता आणि जबाबदार नागरिकत्व ही काळाची गरज बनली आहे. कोणतीही माहिती तपासल्याशिवाय पुढे पाठवणे टाळणे, द्वेषपूर्ण प्रचाराला बळी न पडणे आणि विवेकाने विचार करणे आवश्यक आहे.

दहशतवादाचा परिणाम केवळ सुरक्षेपुरता मर्यादित राहत नाही. देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम होतात. मोठ्या दहशतवादी हल्ल्यांनंतर पर्यटन, व्यापार, उद्योग आणि परकीय गुंतवणूक यांवर विपरीत परिणाम होतो. सरकारला विकासकामांऐवजी सुरक्षाव्यवस्थेवर प्रचंड खर्च करावा लागतो. त्यामुळे राष्ट्रीय प्रगतीचा वेग मंदावतो.

दहशतवादाविरुद्धची लढाई केवळ बंदुकीने जिंकता येत नाही; ती विचारांनी, शिक्षणाने आणि सामाजिक समतेनेच जिंकावी लागते. शिक्षण हे यासाठी सर्वांत प्रभावी माध्यम ठरू शकते. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून शांतता, सहिष्णुता, संविधानिक मूल्ये आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे आवश्यक आहे. विवेकशील समाज दहशतवादाला बळी पडत नाही. महात्मा गांधींनी अहिंसेचा दिलेला संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. हिंसेला हिंसेने उत्तर दिल्यास द्वेष वाढतो; परंतु संवाद, सहकार्य आणि मानवतेच्या भावनेतून समाजात सलोखा निर्माण होतो.भारत सरकार, सैन्यदल, पोलीस आणि गुप्तचर संस्था देशाच्या सुरक्षेसाठी सातत्याने कार्यरत आहेत. सीमावर्ती भागांमध्ये सुरक्षा अधिक मजबूत करण्यात आली आहे. कठोर कायदे, आधुनिक तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून दहशतवादावर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघानेही दहशतवादाला जागतिक शांततेसाठी गंभीर धोका मानले आहे. परंतु या संघर्षात प्रत्येक नागरिकाची भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. धर्म हा मुळात प्रेम, करुणा आणि मानवतेचा संदेश देतो. कोणताही धर्म हिंसा शिकवत नाही. मात्र, काही कट्टरवादी शक्ती धर्माचा चुकीचा अर्थ लावून समाजात द्वेष निर्माण करतात. त्यामुळे सर्वधर्मसमभाव, धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर या मूल्यांचे जतन करणे अत्यावश्यक आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक धर्माला समान आदर दिला आहे. हीच भारताच्या लोकशाहीची ताकद आहे. आज जगाला युद्ध नव्हे, तर शांततेची गरज आहे. दहशतवादाचा मुकाबला केवळ सुरक्षा यंत्रणा करू शकत नाहीत; त्यासाठी जागरूक नागरिक, संवेदनशील समाज, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि जागतिक सहकार्य आवश्यक आहे. हिंसा आणि द्वेषाच्या अंधारातून मानवतेचा प्रकाश जिवंत ठेवणे हीच खरी काळाची गरज आहे.

# रायरेश्वराच्या सान्निध्यात उभा असलेला सह्याद्रीचा पहारेकरी - केंजळगड

**दै. हॅलो प्रभात**



छत्रपती शिवरायांच्या मावळ प्रांतापैकीच एक मावळ म्हणजे हे हिरडस मावळ. पावसाळ्यात सह्याद्रीचं नवचैतन्याचं रूप जर अनुभवायचं असेल तर या हिरडस मावळाला एकदा तरी भेट द्यायलाच हवी. रायरेश्वर, केंजळगड, रोहिडा आदींसारखी दुर्ग रत्ने या मावळात मोठ्या दिमाखात उभी आहेत. या साऱ्या शिलेदारांचा इतिहास आणि पराक्रम हि मोठा रंजक आहे.

सह्याद्रीच्या अनेक उपरांगा आहेत. यातलीच एक उपरांग म्हणजे शंभू-महादेव नावाची एक रांग! पुणे आणि सातारा या दोन जिल्ह्यांच्या सीमारेषेवरून गेलेल्या या डोंगररांगेवर केंजळगड एका डोंगरावर उभा आहे. डोंगरावरचा खणखणीत कातळाचा सुळका हे याचं मोठं वैशिष्ट्य! भौगोलिकदृष्ट्या केंजळगडाची एक सोंड थेट ऐतिहासिक रायरेश्वरालाच जोडलेली आहे. त्यामुळे बहुतेक गडयात्री केंजळगड आणि रायरेश्वर हा जोड ट्रेक जोडूनच करतात.




छत्रपती शिवाजी महाराजांनी शपथ घेतलेले रायरेश्वराचे ठिकाण देखील खूपच सुंदर आहे. या केंजळगडाच्या बाबतीत आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या गडावर असणाऱ्या कातळकोरीव पायऱ्या! गडावर असणाऱ्या कातळकोरीव पायऱ्यांची निर्मिती ही प्राचीन इतिहासाशी जोडलेली आहे. हजारो वर्षापूर्वीची निर्मिती असणाऱ्या कातळात खोदलेल्या या केवळ पायऱ्या नसून तो आपल्यासारख्यांसाठी एक उत्कृष्ट दुर्गवास्तुशास्त्राचा अनमोल ठेवाच आहे, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. हा ठेवा काही मोजक्याच किल्ल्यांना लाभला आहे. यात केंजळगडाचं नाव अग्रभागी घ्यावंच लागतं.

## गडाचा इतिहास

केळंजा आणि मोहनगड या नावाने देखील ओळखला जाणाऱ्या या गडाची निर्मिती ही राजा भोज यांनी बाराव्या शतकात केल्याचे संदर्भ अनेक ठिकाणी येतात. त्यानंतर हा गड आदिलशहाच्या ताब्यात गेला परंतु १६७४ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात दाखल करून घेतला व सरतेशेवटी १८१८ साली इंग्रजांनी हा गड जिंकून घेतला.

## गडाचा परिचय

सह्याद्रीच्या शंभू-महादेव रांगेवर तब्बल सव्वाचार हजार फूट उंचीचा हा कातळदुर्ग ठाण मांडून बसलाय. या गडावर जाण्यासाठी भोरवरून आंबवडे अनब त्यानंतर गडाच्या पायथ्याचं कोर्ले हे गाव गाठाव लागत.

कोर्ले हे गावही अगदी डोंगराच्या कुशीत पहुडलेलं आहे. गावच्या उजव्या बाजूला ऐतिहासिक रायरेश्वराचं अमर्याद पसरत गेलेलं पठार आणि डाव्या बाजूला डोक्यावर टोपी घातलेल्या आकाराचा हा रांगडा वीर केंजळगड. बहुतेक ट्रेकर केंजळगडावर चढाई करून रायरेश्वर पाहूनच खाली उतरतात किंवा रायरेश्वरवरून केंजळगड असा ट्रेक करतात.

कोर्ले गावातूनच दोन तासांची खडी चढाई करून आपण डोंगराच्या सपाटीवर पोहचतो. या सपाटीवर सात-आठ घरे असून केंजळाईचं मंदिर देखील आहे. येथल्या वस्तीच्या मागे जर पाहिलं तर केंजळगड भल्यामोठ्या कातळी पहाडासारखाच भासतो. चारही बाजू अगदी तासून बसवल्यासारखाच! साधारण तासाभराच्या चढाईनंतर आपण गडमाथ्याच्या खाली 'त्या' कातळकोरीव पायऱ्यांसमोर येतो , अनब आश्चर्याने तोंडात बोटे घालतो एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल पंचावन्न पायऱ्या कातळात खोदलेल्या पाहून थक्क होतो .

नितांत सुंदर अशा पायऱ्या पार करून आपण माथ्यावर प्रवेश करतो अनब सह्याद्रीच्या अनभिषिक्त साम्राज्याचा एक भागच बनून जातो.

अगदी प्राचीन निर्मिती असलेल्या या दुर्गावर सुस्थितीत असे काहीच नाही. डोळ्याला दिसतात त्या पडक्या इमारती. उद्धवस्त प्रवेशद्वार आणि चुन्याचा घाणा एवढेच.

गडाच्या माथ्यावरून दिसणाऱ्या आजूबाजूचं वर्णन हे खरं तर शब्दांच्याही पलीकडे आहे हे फक्त अतृप्त नजरेने, गार भन्नाट वाऱ्याच्या स्पर्शाने आणि निसर्गाच्या गंधाने हळुवारपणे आपण अनुभवायचे.या गडाच्या माथ्यावरून रायरेश्वर, रेघिडा, कमळगड ही दुर्गशिखरे दिसतात.

• प्रा.साईप्रसाद कुंभकर्ण
इतिहास अभ्यासक,व्याख्याते
संपर्क : ९०११८९०२७९



# सांगली-कोल्हापूर रस्ता तातडीने पूर्ण करा

## मदनभाऊ पाटील युवा मंचाची निवेदनाद्वारे मागणी

**सांगली : हॅलो प्रभात**




गेल्या वर्षभरापासून सुरू असलेल्या सांगली-कोल्हापूर रस्त्याच्या कामामुळे वाहतूक कोंडी, अपघातात वाढ झाली असून हा रस्ता तातडीने पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात यावा, अशी मागणी मदनभाऊ पाटील युवा मंचाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, सांगली-कोल्हापूर या रस्त्यावर अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. मात्र रस्त्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून संथ गतीने सुरू असल्याने दररोज वाहतुकीची मोठी कोंडी होत आहे. अपूर्ण आणि धोकादायक रस्त्यामुळे लहान-मोठ्या अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. काहींना आपला जीवही गमवावा लागला आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. शाळकरी मुले, पालक आणि नागरिकांना या रस्त्यावरून प्रवास करताना मोठा धोका निर्माण होत असल्याने प्रशासनाने हस्तक्षेप करून रखडलेले काम पूर्ण क्षमतेने सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

असे न झाल्यास मदनभाऊ पाटील युवा मंचाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष शितल लोंढे यांनी दिला आहे.

# धर्मपुरीत 'विरंगुळा ज्येष्ठ नागरिक कट्टा' उपक्रमाचे लोकार्पण



खा.मोहिते-पाटील आणि आ.जानकर यांच्या हस्ते उद्घाटन

**नातेपुते : हॅलो प्रभात**

सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवरील धर्मपुरी गावात ज्येष्ठ नागरिकांसाठी उभारण्यात आलेल्या 'विरंगुळा ज्येष्ठ नागरिक कट्टा' या उपक्रमाचे लोकार्पण उत्साहात पार पडले. ग्रामपंचायत सदस्यांच्या संकल्पनेतून तसेच अॅड. संदीप वाघ यांच्या केल्फोस फाउंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून हा उपक्रम साकारण्यात आला आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील आणि आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी अर्जुनसिंह मोहिते-पाटील, गौतम पाटील, माऊली पाटील, अॅड. शिवाजी पिसाळ, सतीश सपकाळ, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळा, संवाद आणि सामाजिक एकोप्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. या माध्यमातून गावातील ज्येष्ठांना सुरक्षित आणि सुसज्ज ठिकाण उपलब्ध झाले असून, ज्येष्ठांचा सन्मान हीच संस्कृती असल्याचा संदेश अधिक दृढ झाल्याचे मान्यवरांनी सांगितले.

# सिड्बीच्या स्थापना दिनानिमित्त नव्या उपक्रमांची घोषणा

**मुंबई : हॅलो प्रभात**




केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मुंबईत स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (सिड्बी) च्या ३७ व्या स्थापना दिन कार्यक्रमात सहभाग घेत एमएसएमई क्षेत्राच्या विकासातील सिड्बीच्या योगदानाचे कौतुक केले.

यावेळी बोलताना त्यांनी रोजगारनिर्मिती, निर्यात वाढ आणि देशाच्या आर्थिक विकासात एमएसएमई क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे सांगितले. पश्चिम आशियातील संघर्षामुळे प्रभावित उद्योगांसाठी केंद्र सरकारने 'ईसीएलजीएस ५.०' योजना सुरू केल्याची माहितीही त्यांनी दिली.

तसेच सिड्बीसाठी सरकारने दिलेल्या ५ हजार कोटी रुपयांच्या भांडवली सहाय्याचा उल्लेख करत सिड्बीची 'मार्केट मेकर' म्हणून भूमिका अधोरेखित केली.

कार्यक्रमात 'सिड्बी आरआरबी को-लेंडिंग पोर्टल' सुरू करण्यात आले. या माध्यमातून प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या सहकार्याने ग्रामीण भागातील कर्जपुरवठा वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. 'सिड्बी मॅकफिन मार्ट' या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे एमएसएमई उद्योगांना यंत्रसामग्री खरेदी आणि कर्ज प्रक्रिया सुलभ होणार आहे.

याशिवाय 'मोरे' (मॉडर्नायझेशन ऑफरुरलएंटरप्रायझेस)उपक्रमांतर्गत पुढील तीन वर्षांत १० हजार ग्रामीण व हस्तकला उद्योगांना मदत केली जाणार आहे. सूक्ष्म उद्योगांसाठी ५ लाख रुपयांच्या मर्यादेचे क्रेडिट कार्डही सुरू करण्यात आले.

# चंदनदादा चव्हाण यांचा वाढदिवस होणार साधेपणाने साजरा

**सांगली : हॅलो प्रभात**



गुंठेवारी क्षेत्रातील लाखो नागरिकांना हक्क मिळवून देण्यासाठी तीन दशकांहून अधिक काळ संघर्ष करणारे आणि जयहिंद सेना पक्षाचे संस्थापक अध्यक्ष चंदनदादा चव्हाण यांचा वाढदिवस २७ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता गुंठेवारी भवन येथे साध्या पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. देशातील सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन कोणताही डामडौल न करता सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

१९९४ साली 'गुंठेवारी' हा शब्द महसूल खात्याच्या नोंदीतही नव्हता. शहरालगतच्या शेतजमिनींचे छोटे तुकडे करून उभारण्यात आलेली घरे अनधिकृत ठरत होती. अशा लाखो कुटुंबांना ना सातबारा नोंद, ना वीज, पाणी किंवा रस्त्याच्या सुविधा मिळत होत्या. या नागरिकांच्या न्यायहक्कांसाठी चंदनदादा चव्हाण यांनी गुंठेवारी चळवळीचा झेंडा हाती घेतला. माजी खासदार प्रकाशबापू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या चळवळीची पुढील संपूर्ण जबाबदारी त्यांनी सांभाळली.

सांगली जिल्ह्यात 'हंटर फोड आंदोलन' आणि 'बोंबाबोंब आंदोलन' यांसारख्या आक्रमक आंदोलनांद्वारे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. तत्कालीन मुख्यमंत्री कै. मनोहर जोशी यांच्यासमोर त्यांनी गुंठेवारीचा प्रश्न ठामपणे मांडला. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे २००१ साली महसूल खात्यात 'गुंठेवारी' हा शब्द अधिकृतपणे समाविष्ट झाला आणि गुंठेवारी कायदा अस्तित्वात आला. त्यामुळे महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांना त्यांच्या घरांचा कायदेशीर हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

जयहिंद सेना पक्षाच्या माध्यमातून त्यांनी राजकीय क्षेत्रातही स्वतंत्र ओळख निर्माण केली असून महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यांत पक्षाचे कार्य विस्तारले आहे. सांगली येथे त्यांनी महाराष्ट्रातील पहिले 'गुंठेवारी भवन' उभारले असून येथे दररोज शेकडो नागरिकांना मोफत मार्गदर्शन केले जाते. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना 'सांगली भूषण' आणि 'क्रांतिवीर' यांसारख्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

# 'लाईव्ह' मराठी चित्रपटाचा मुहूर्त गीत ध्वनीमुद्रणाने संपन्न

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



सोशल मीडियाच्या युगात 'लाईव्ह' गोष्टींना वाढते महत्त्व प्राप्त झाले असून, याच संकल्पनेवर आधारित 'लाईव्ह' हा आगामी मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचा मुहूर्त नुकताच गीत ध्वनीमुद्रणाने पार पडला.

रिद्धी बिद्धी व्हिजनच्या बॅनरखाली निर्माता सुमित पांडे चित्रपटाची निर्मिती करत असून, छबी असीम हल्दर हे प्रस्तुतकर्ते आहेत. चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन संजीव राय यांनी केले असून, संवादलेखन पूनम विभूते यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे.

अंधेरी येथील पंचम स्टुडिओमध्ये चित्रपटातील 'स्वप्न सुंदरी...' हे गीत ध्वनीमुद्रित करण्यात आले. गीतकार महालिंग कंठाळे यांच्या गीतांना संगीतकार दिनेश अर्जुना यांनी संगीत दिले असून, गायिका डॉ. नेहा राजपाल यांनी हे गीत गायले आहे.

# सूचीबद्ध REITs कडून युनिटधारकांना ८,९०० कोटींचे वितरण

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील पाच सार्वजनिकरित्या सूचीबद्ध रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्स यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये युनिटधारकांना एकत्रितपणे ८,९०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित केली आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या चौथ्या तिमाहीतच ४.२५ लाखांहून अधिक युनिटधारकांना २,५६६ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले.

ब्रुकफिल्ड इंडिया रिअल इस्टेट ट्रस्ट, एम्बसी ऑफिस पार्क REIT, नॉलेज रिअल्टी ट्रस्ट, माईडस्पेस बिझनेस पार्क्स R>EIT आणि नेक्सस सिलेक्ट ट्रस्ट या पाच REITs चा यात समावेश आहे.

आर्थिक वर्ष २०२६ च्या अखेरीस भारतीय ठएखढ बाजाराचे एकूण स्थूल मालमत्ता मूल्य २.७२ लाख कोटी रुपयांवर पोहोचले असून, २२ मे २०२६ पर्यंत या क्षेत्राचे एकत्रित बाजार भांडवल १.७० लाख कोटी रुपयांहून अधिक झाले आहे.

१८७ दशलक्ष चौरस फुटांहून अधिक 'ग्रेड ए' कार्यालयीन व किरकोळ मालमत्तेचे व्यवस्थापन या REITs कडून करण्यात येत आहे. स्थापनेपासून आतापर्यंत त्यांनी युनिटधारकांना ३१,७०० कोटींहून अधिक वितरण केले आहे.

# 'जनक' चित्रपटाचे चित्रीकरण १९ दिवसांत पूर्ण

**मुंबई : हॅलो प्रभात**

मराठी चित्रपटसृष्टीकडे वाढत्या आकर्षणाच्या पार्श्वभूमीवर दिग्दर्शक आणि निर्माता अभिषेक कंवर यांनी 'जनक' या मराठी चित्रपटाच्या माध्यमातून पदार्पण केले आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण पुणे आणि भोर परिसरात अवघ्या १९ दिवसांत पूर्ण करण्यात आले.

ज्येष्ठ बॉलीवूड चित्रपट निर्माते के. पप्पू यांचे सुपुत्र तसेच दिग्दर्शक-निर्माते राज कंवर यांचे पुतणे असलेल्या अभिषेक कंवर यांनी दिग्दर्शनाचा प्रवास मराठी चित्रपटातून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. 'आरटीबी फिल्म्स'च्या बॅनरखाली निर्मित या चित्रपटात ते निर्माता आणि दिग्दर्शक अशा दुहेरी भूमिकेत आहेत. त्रिलोक सिंग राजपूत यांनी सह-निर्मात्याची जबाबदारी सांभाळली आहे.

चित्रपटात सायली संजीव, अविनाश नारकर, अनुष्का मनीष पिंपुटकर आणि सुरेश विश्वकर्मा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पटकथा ओंकार भस्मे, अभिषेक कंवर आणि राकेश नामदेव शिर्के यांनी लिहिली आहे. संपूर्ण टीमच्या समन्वयामुळे चित्रपटाचे चित्रीकरण विक्रमी वेळेत पूर्ण झाल्याचे निर्मात्यांनी सांगितले.

# हर्ष पटेल यांची दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती

**मुंबई : हॅलो प्रभात**



'वॉटर अँड शार्क'चे संस्थापक आणि जागतिक मुख्य कार्यकारी अधिकारी अॅड. सीए. हर्ष गिरीश पटेल यांची भारत सरकारच्या संचार मंत्रालयाच्या दूरसंचार सल्लागार समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबईतील मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या हर्ष पटेल यांनी 'नरसी मोन्जी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स' तसेच 'गोपालदास झमतमल अडवाणी लॉ कॉलेज'मधून शिक्षण पूर्ण केले आहे. कायदा, वित्त आणि जागतिक व्यावसायिक नेतृत्व क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

कायदेशीर क्षेत्रातील तज्ज्ञता, आंतरराष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व आणि भारताच्या जागतिक प्रशासकीय स्थानाला बळकटी देण्यासाठी असलेल्या बांधिलकीमुळे त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे मुंबईसह राज्यातील तरुण व्यावसायिकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

हॅलो प्रभात
नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६. (महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.
■ **मुंबई कार्यालय :** सी-५०३, निर्मल रेसिडेन्सी, कात्रप रोड, गणेश घाट, बदलापूर (पू), ठाणे - ४२१५०३ ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ पुणे आवृत्ती संपादक : संजीव शाळगावकर ■ सांगली आवृत्ती संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपर्क : 9011889001

# अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत ५,०१२ सहाय्यक प्राध्यापक भरतीला मंजुरी

**पुणे : हॅलो प्रभात** : राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न उच्च शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गात एकूण रिक्त असलेल्या पदांपैकी पाच हजार १२ रिक्त पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. ही भरती करताना विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांना बिनचूक आरक्षण धोरण अंमलबजावणी करता यावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेत एक दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून स्वायत्त महाविद्यालयांना, तर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न अन्य महाविद्यालयांतील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांकरिता लागू करण्यात आले. शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने पदभरतीबाबत वेळोवेळी दिलेले निर्देश विचारात घेता, महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरणे आवश्यक होते. या अनुषंगाने राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गात एकूण रिक्त असलेल्या पदांपैकी पाच हजार १२ रिक्त पदांच्या भरतीला मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने सामाजिक आणि समांतर आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील उपकुलसचिव आणि सहाय्यक कुलसचिव (मागास वर्ग कक्ष) यांच्याकरिता हे प्रशिक्षण झाले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सुनेत्रा पवार यांची वारकरी सप्ताह सोहळ्यास उपस्थिती

**बारामती : हॅलो प्रभात**

■ अजितदादांच्या जनसेवेच्या कार्याला दिला उजाळा

उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार या बारामती दौऱ्यावर असताना त्यांनी निरा येथे आयोजित श्री संत शिरोमणी सावता महाराज वारकरी सप्ताह सोहळ्यास उपस्थिती दर्शवली. यावेळी त्यांनी वारकरी सप्ताहाच्या ठिकाणी लोकनेते दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. यावेळी उपस्थित वारकरी बांधवांशी संवाद साधताना सुनेत्रावहिनी यांनी अजितदादांच्या कार्याची आठवण करून दिली. *"मानवता हाच धर्म व मानव सेवा हीच ईश्वरसेवा, याच विचारांवरती दादांनी जनसेवेचा वसा अखंडपणे अविरत सुरू ठेवला होता,"* अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या प्रसंगी मोठ्या संख्येने वारकरी, नागरिक तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.




### वे ट्रू लाईफ फुटबॉल अकॅडमीचा 'वीरान कप' वर विजय

**देऊळगाव गाडा : हॅलो प्रभात**

दि. 15 मे ते 18 मे 2026 दरम्यान गोव्यातील बेनेलीम येथे प्रतिष्ठित "वीरान कप 2026" फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये तामिळनाडू, पश्चिम बंगाल, कर्नाटक, राजस्थान, हरियाणा, दिल्ली आणि महाराष्ट्र अशा सात राज्यांतील विविध फुटबॉल अकॅडमींच्या संघांनी सहभाग घेतला होता. अंडर-12 गटामध्ये एकूण 16 संघ सहभागी झाले होते. अशा मोठ्या स्पर्धेमध्ये केडगाव (ता. दौंड, जि.पुणे ) गावातील "वे ट्रू लाईफ फुटबॉल अकॅडमी"ने दमदार कामगिरी करत अंतिम सामन्यादरम्यान विजेतेपद पटकावले. या संघाने एकूण सात सामने खेळले.यात अंतिम सामन्यादरम्यान झालेल्या अतिमुसळधार पाऊस व वादळी वाऱ्यात वे ट्रू लाईफ अकॅडमीच्या खेळाडूंनी जिद्द आणि सांघिक खेळाच्या जोरावर प्रतिस्पर्धी गटाला पेनल्टी शूटआऊट मध्ये ३-२ च्या फरकाने धूळ चारत वीरान कप 2026 वर आपले नाव कोरले. या विजयी संघात प्रजीत भापकर, वरद नवले, राघव गायकवाड, शौर्य कुलकर्णी, अर्णव पाठक, दिव्यम मांढरे, अर्णव शिर्के, हर्षद सोडणवर, राजवीर शिंदे ,रोहित सोडणवर आणि श्लोक लवांडे यांनी सहभाग घेतला. प्रशिक्षक मिखिल पवार यांची मेहनत आणि मार्गदर्शनामुळे संघाने हि ऐतिहासिक कामगिरी सध्या केली. या शानदार विजयामुळे केडगाव गावासह संपूर्ण पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .यामुळे पुढील काळात ग्रामीण भागातील युवा खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळणार आहे.



### ग्रामीण विद्यार्थ्यांनी आधुनिक शिक्षणाला महत्त्व द्यावे : दादा भालेकर

**पारनेर : हॅलो प्रभात**

■ १२ वी परीक्षेत यश संपादन केलेल्या 'अभिनव'चा सत्कार

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व समजून घेऊन सध्याच्या आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करावा आणि नवनवीन तंत्रज्ञानातील शिक्षणाला महत्त्व द्यावे, असे मत ज्येष्ठ पत्रकार दादा भालेकर यांनी केले. वासुंदे (ता. पारनेर) येथील जोगेश्वरी पतसंस्थेचे व्हा.चेअरमन तथा उद्योजक अशोक खराबी यांचे चिरंजीव कु.अभिनव अशोक खराबी याने राजस्थान येथील कोटा येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शिक्षण घेत असताना, केंद्रीय शिक्षण मंडळ अंतर्गत १२ वी बोर्ड परीक्षेत ९५.२०% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. विशेष म्हणजे त्याने गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त करून गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या अभूतपूर्व यशामुळे वासुंदे येथे वासुंदेकर ग्रामस्थांच्या वतीने अभिनवचा जाहीर सन्मान व सत्कार करण्यात आला. व्यासपीठावरून बोलताना दादा भालेकर यांनी अभिनवच्या यशाचे कौतुक केले आणि ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांनीही त्याचा आदर्श घेऊन तंत्रज्ञानाच्या युगात स्वतःला सिद्ध करावे, असा संदेश दिला. या कौतुक सोहळ्याप्रसंगी पो. मा. झावरे, ज्येष्ठ नेते भागुजी झावरे, बापूसाहेब गायके, भास्कर चेमटे, गजानन झावरे, मारुती उगले, इंजि. किरण झावरे, मारुती उगले, बबन गांगड, डॉ. बाबासाहेब गांगड, मारुती दाते, सुरेश शिंदे, अभिनव पाटोळे, अशोक चेमटे सर, संदीप खराबी, पोपट झावरे, योगेश रोकडे, उमेश खराबी, साई खराबी, श्रेयश खराबी यांच्यासह परिसरातील नागरिक, तरुण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभिनवच्या या यशामुळे संपूर्ण वासुंदे गावात आनंदाचे वातावरण पसरले असून, सर्व स्तरांतून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.




## अनियमित पाणीपुरवठ्याने साईनाथनगरकर हैराण : पाणीपुरवठा विभागाचे अपयश

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके

**आजच्या परिस्थितीत उच्चभ्रू सोसायटीमधील पाणी येत नसेल तर खासगी टँकरव्दारे विकत पाणी घेण्यास प्राधान्य देऊ शकतात. मात्र सध्या वाढत्या महागाईच्या काळात गोरगरीब कुटुंबांना मुलांचे शिक्षण पाहायचे की,घरखर्च पाहायचा हा मुख्य प्रश्न अनेकांना सतावत असताना अशा काळात अशा कुटुंबांना खाजगी टँकरने विकत पाणी घेणे परवडणारे नसल्यामुळे पालिका अधिकाऱ्यांनी प्रामुख्याने अशा भागाकडे पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर कशा पद्धतीने मात करता येईल याकडे लक्ष देणे काळाची गरज आहे.**

शहराचे दक्षिणेचे प्रवेशव्दार म्हणून पाहिल्या जाणाऱ्या अप्पर डेपो परिसरातील साईनाथनगर परिसरातील नागरिकांना अनियमित व कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्यास सामोरे जाण्याची वेळ येऊन शहराच्या दक्षिणेच्या प्रवेशद्वारावरच जनतेला एक हंडाभर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येत आहे.त्यामुळे पाणीपुरवठा विभाग अधिकाऱ्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यास पालिका असमर्थ ठरल्याचे स्पष्ट होत आहे. शहरातील इतर भागाप्रमाणेच दक्षिणेचे प्रवेशव्दार म्हणून कात्रजासह अप्पर डेपो परिसराकडे प्रामुख्याने पाहिले जात असल्याने परिसरात कामानिमित्त कामगार वर्ग गेल्या अनेक वर्षापासून अप्पर डेपोसह साईनाथनगर परिसरात नागरिक अनेक वर्षापासून स्थायिक झाले आहेत.त्यामुळे या भागातील नागरिकांना पथदिवे,रस्ते,ड्रेनेज लाईनसह पालिका पाणीपुरवठा विभागामार्फत पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होण्याच्या नळजोड बसवून पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली असली तरी पण साईनाथनगर करांना पाणीटंचाईस सामोरे जाण्याची वेळ येत आहे.

साईनाथनगर परिसराची जवळपास एक लाखाच्या आसपास लोकसंख्या असल्याने परिसरात सुरळीत पाणीपुरवठा होण्याच्या उद्देशाने पालिका पाणीपुरवठा विभागामार्फत घरोघरी नळजोड करण्यात आले आहे.मात्र सध्या उष्णतेने त्रस्त झालेल्या नागरिकांना आता पाणीटंचाईमुळे हैराण होण्याची वेळ आली आहे.सध्या परिसरात पाणीपुरवठा होत आहे.मात्र अनियमित व कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना एक हंडा मिळविण्यासाठी भर उन्हासत भटकण्याची वेळ येत आहे. त्यातच परिसरात प्रामुख्याने मोलमजुरी करणारे कामगार वर्ग प्रामुख्याने स्थायिक झाले आहेत.त्यामुळे अशा कुटुंबातील नागरिकांना खाजगी टँकरने विकत पाणी घेण्याचे परवडणारे नसल्यामुळे भर उन्हात अनेक महिला ह्या पिण्याच्या पाण्यासाठी मिळेल त्या ठिकाणी धाव घेत असल्याचे चित्र शहरातील या भागात पाहायला मिळत आहे. त्यातच काही महिन्यापूर्वी पालिका निवडणूक काळात अनेक इच्छुक उमेदवारांनी परिसरातील पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याचा दावा केला होता.मात्र दावा नेते करणारे नेत्यांना शोधण्याची वेळ नागरिकांवर येऊन यासंदर्भात वारवार स्थानिकांनी पाणीपुरवठा अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करून देखील त्यांच्या प्रयत्नांना यश न येता त्यांच्या पदरी निराशाच पडली असल्याचे दिसून येत आहे.

तर पालिकेच्या पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी जनतेच्या समस्येकडे पाठ फिरविल्यामुळे स्थानिक नागरिकांना ऐन उन्हाळ्यात मुख्य पाण्याचा प्रश्न सतावत आहे.

त्यामुळे सर्वसामान्य जनतेचे मुख्य असलेले प्रश्न खरोखरच पालिकेचे अधिकारी सोडवण्यास सक्षम आहेत का?हा मुख्य सवाल उपस्थित होऊन अधिकाऱ्यांनी जनतेचा पाण्याचा प्रश्न सोडविण्याऐवजी जनतेच्या मुख्य समस्येकडे पाठ फिरवून केराची टोपली दाखवली असल्याचे म्हणण्याची वेळ नागरिकांवर येऊन नागरिकांचे पाण्याच्या मुख्य समस्येकडे पाठ फिरविणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाईची काय?भूमिका घेणार हे देखील महत्वपूर्ण ठरणार आहे. तरी नागरिकांचे मुख्य पाण्याचा प्रश्न सोडवण्यास अधिकाऱ्यांनी प्राधान्य देऊन तो सोडविण्यात यावा.अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## हडपसरमध्ये नशेच्या इंजेक्शनची बेकायदा विक्री उघड

**पुणे : हॅलो प्रभात**

■ सराईत गुन्हेगार अभिषेक भडंगे अटक, ८२ बाटल्या जप्त

बॉडी बिल्डिंग आणि नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिबंधक औषधांची (इंजेक्शन्स) बेकायदेशीरपणे विक्री करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी हडपसर परिसरातून अटक केली. अभिषेक खंडू भडंगे (वय २५, रा. हिंगणे मळा, हडपसर, पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर यापूर्वी हडपसर पोलिस ठाण्यात ११ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरात २४ मे रोजी पहाटेपर्यंत गुन्हे शाखेकडून कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. त्यावेळी आरोपी अभिषेक भडंगे हा हिंगणे मळा येथील आकाश डांग माळी यांच्या खोलीत भाड्याने राहतो. तो तेथून नशेसाठी वापरले जाणारे 'मेफेनटरमाइन सल्फेट' हे प्रतिबंधक इंजेक्शन विनापरवाना विकत असल्याची माहिती युनिट सातचे सहाय्यक निरीक्षक मदन कांबळे आणि खंडणी विरोधी पथक- दोनचे पोलिस निरीक्षक राम राजमाने, पोलिस अंमलदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, किरण पड्याळ यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याठिकाणी छापा टाकला. पोलिसांची चाहुल लागताच आरोपी अभिषेकने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला.

## 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६'ने बहरली सासवडची माती

### ३० जूनपूर्वी कर्जमाफी व अनुदानाची कृषीमंत्र्यांची घोषणा

**पुरंदर : हॅलो प्रभात**




बदलत्या हवामानाचा फटका बसून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. येत्या ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि प्रोत्साहन अनुदानाचा लाभ देण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रेय भरणे यांनी सासवड येथे केली. शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' या भव्य कृषी व पशू प्रदर्शनाला रविवारी (ता. २४) त्यांनी भेट दिली.

या प्रदर्शनाच्या निमित्ताने कृषी क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. यामध्ये जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, संचालक रमेश थोरात, आप्पासाहेब जगदाळे, दिलीप मोहिते, पुजा बुट्टे पाटील, निर्मला जागडे, संजय काळे, तसेच सारिका भरणे आणि हेमंतकुमार माहूरकर उपस्थित होते. याशिवाय ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, समरादित्य जगताप, कात्रज डेअरीचे उपाध्यक्ष तानाजी जगताप, निरा मार्केट कमिटीचे सभापती संदीप फडतरे, संचालक मनिषा नाझीरकर, देविदास कामथे, संभाजी काळाणे, विठ्ठल मोकाशी, तुषार माहूरकर तसेच संयोजक प्रदीप पोमण, प्रकाश पवार, संभाजी गरुड, विलास जगताप, रवींद्रपंत जगताप आणि सतिश शिंदे यांच्यासह अनेक शेतकरी आणि नागरिक उपस्थित होते.

**कृषीमंत्र्यांचे शब्द**

**नवीन बियाणे आणि खते यांत मोठे संशोधन होत आहे. शेतकऱ्यांनी नेहमी कृषी विभागाच्या संपर्कात राहून नवीन पद्धतीने शेती करावी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या जमिनी विकू नका, कारण येणारे दिवस हे केवळ आणि केवळ शेतीचेच असणार आहेत.**

**-दत्तात्रय भरणे, कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य**

## खुळेवाडी उपकेंद्र येथे नवीन अतिउच्च दाब उपकेंद्र उभारणी करा

**पुणे : हॅलो प्रभात**

### आ. बापूसाहेब पठारे यांच्या मागणीवर मुख्यमंत्र्यांचे निर्देश



वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील वाढत्या वीज समस्यांच्या पार्श्वभूमीवर खुळेवाडी येथे नवीन १३२/२२ के.व्ही. अतिउच्च दाब उपकेंद्र उभारण्याबाबत आमदार बापूसाहेब पठारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर केले होते. या निवेदनाची मुख्यमंत्री महोदयांनी गंभीर दखल घेत संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदर निवेदनावर "अ.मु.स. ऊर्जा तपासून कार्यवाही करावी" असे स्पष्ट निर्देश दिले असून, संबंधित विभागाने नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ शासनास सादर करावा, असे आदेश देण्यात आले आहेत. वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाल्याने वीजेची मागणी झपाट्याने वाढत आहे. खुळेवाडी येथील विद्यमान १३२/२२ के.व्ही. अतिउच्च दाब उपकेंद्र सध्या पूर्ण क्षमतेने कार्यरत असून ते ओव्हरलोड झाल्याने वारंवार तांत्रिक बिघाड आणि वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना वाढल्या आहेत. याचा मोठा फटका नागरिकांना बसत असून दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर खुळेवाडी उपकेंद्रालगत असलेल्या एलआयसीच्या जागेत नवीन अतिउच्च दाब उपकेंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी आमदार बापूसाहेब पठारे यांनी केली होती. या प्रस्तावामुळे भविष्यातील वाढती वीज मागणी पूर्ण होऊन वडगाव शेरी, धानोरी, लोहगाव आणि परिसरातील नागरिकांना अखंड, दर्जेदार व स्थिर वीजपुरवठा मिळण्यास मोठी मदत होणार आहे. यासंदर्भात नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, परिसरातील वाढत्या वीज समस्यांच्या निराकरणासाठी शासन सकारात्मक पावले उचलत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## हॉकर्स, टपऱ्या, रस्त्यावरील खाद्यगाड्या बंद; सारसबाग, नदीपात्र चौपाट्यांवरही निर्बंध

**पुणे : हॅलो प्रभात**

शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते, हॉकर्स, गाड्या आणि पानटपऱ्या रात्री १० वाजेनंतर बंद करण्यात येणार आहेत. त्यामध्ये सारसबाग आणि नदीपात्रासह इतर चौपाट्यांवरीलही खाद्यपदार्थ विक्री रात्री दहानंतर बंद राहील, असे पोलिसांनी स्पष्ट केले. गेल्या काही दिवसांपासून शहरात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. रात्रीच्या वेळी टपऱ्या आणि खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर होणारी गर्दी, त्यातून होणारे वाद आणि भाईगिरीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर शहरात रात्रीची नाकाबंदी आणि पोलिसांची गस्त देखील वाढवण्यात आली आहे. पोलिसांच्या या निर्णयामुळे रात्रीच्या वेळी व्यवसाय करणाऱ्या छोट्या विक्रेत्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. रात्री उशिरापर्यंत चालणारे स्टॉल्स आणि हॉकर्समुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. शहरात रात्रीच्या वेळी येणाऱ्या-जाणाऱ्या संशयास्पद वाहनांची कसून तपासणी केली जात आहे.

## गायीला राष्ट्रीय पशू घोषित करावे; बारामती मुस्लिम समाजाची मागणी

**बारामती शहर : हॅलो प्रभात**



बारामती मुस्लिम समाजाच्या वतीने आज प्रांताधिकारी, तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी (DYSP) तसेच बारामती शहर पोलीस निरीक्षक यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. सदर निवेदनामध्ये महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या गोहत्या बंदी, गोतस्करी प्रतिबंध व गोसंरक्षण संदर्भातील कायद्यांना बारामतीतील मुस्लिम समाजाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच हिंदू समाजाच्या श्रद्धेचा विषय असलेल्या गोमातेला "राष्ट्रीय पशू" घोषित करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी शेतकरी व पशुपालकांच्या अडचणी लक्षात घेऊन निरुपयोगी व पालन अशक्य झालेल्या गायींसाठी आर्थिक मोबदला देणे, गोपालनासाठी प्रतिदिन अनुदान सुरू करणे, गोशाळांची संपूर्ण जबाबदारी शासनाने स्वीकारणे आदी मागण्या करण्यात आल्या. तसेच गोसंरक्षणाच्या नावाखाली कायदा हातात घेणाऱ्या व मॉब लिंचिंग करणाऱ्या प्रवृत्तीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

गोवंश संरक्षणासोबतच कायदा सुव्यवस्था, सामाजिक सलोखा आणि संविधानिक मूल्ये जपली जावीत, अशी भूमिका बारामती मुस्लिम समाजाच्या वतीने मांडण्यात आली.

या निवेदनावर मुनीर दादाभाई तांबोळी, अजिज जाफर सय्यद, पीर मोहम्मद शेख, कासम हरून कुरेशी, एजाज बशीर शेख, सलमान मन्सूर शेख, रियाज सुलतान सय्यद, लतीफ शेख, मोइन युनुस बागवान, फैयाज इलाही शेख, मन्सूर कमाल शेख, आक्रम अजिज बागवान, इब्राहिम आजिज बागवान, आरिफ मुजावर, अर्सलान जाकिर बागवान, आसिफ शेख, दस्तगीर रहमान शेख, अजहर युनुस शेख, तालीब कुरेशी, खाजा कुरेशी, ए. के. कुरेशी, रियाज शौकत शेख, वसीम नजीर कुरेशी, कलीम कुरेशी यांच्यासह विविध मान्यवरांच्या सह्या आहेत.

यावेळी बसपा पक्षाचे ज्येष्ठ नेते काळुराम चौधरी, बीएसपी जिल्हा उपाध्यक्ष विजय जगताप, आरपीआय तालुकाध्यक्ष संजय वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते चिऊशेठ जंजिरे, अफरोज मुजावर, तोसीफ बागवान, जैद बागवान, मुन्नाभाई बागवान, पत्रकार आय्याज शेख, तैनुर शफीक शेख, मन्सूर शेख, मोईन बागवान, मोहसीन शेख तसेच इतर मुस्लिम बांधव उपस्थित होते. प्रशासनाने या मागण्यांवर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी बारामती मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

**गायीला राष्ट्रीय पशू घोषित करावे. तसेच, आतापर्यंत पोलिसांमार्फत जी जनावरे गौशाळेत देण्यात आलेली आहेत, त्या जनावरांचे काय झाले याची चौकशी झाली पाहिजे.**

**-फैयाज शेख, पुणे जिल्हाध्यक्ष, ए.आय. एम.आय.एम.**

# भूमी अभिलेख कार्यालयाविरोधात माहिती आयोगाच्या आदेशाचा अवमान ?

## २.५ वर्षांपासून RTI माहिती रखडल्याने तक्रारदार आक्रमक

**कराड : अनिल मोरे**

राज्य माहिती आयोगाच्या स्पष्ट आदेशानंतरही मागितलेली माहिती न दिल्याने सातारा जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय आणि कराड भूमी अभिलेख कार्यालय अडचणीत सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माहिती अधिकार कार्यकर्त्या इंदुमती खबाले यांनी आयोगाकडे तातडीने ऑनलाईन सुनावणी घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर अवमान कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश आत्माराम खबाले यांनी १ फेब्रुवारी २०२३ रोजी चुकीची मोजणी रद्द करून वहीवाटीप्रमाणे फेरमोजणी करण्यासाठी अर्ज केला होता. या प्रकरणासंदर्भातील माहिती माहिती अधिकार कायद्यान्वये मागविण्यात आली होती. संबंधित माहिती मिळण्यासाठी नोव्हेंबर २०२२ मध्येच शुल्क भरूनही अद्याप संपूर्ण माहिती देण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांनी आदेश क्रमांक १५२९/२०२३ अन्वये २० मे २०२४ रोजी संबंधित कार्यालयांना मागितलेली माहिती "नोंदणीकृत पोस्टाने व विनामूल्य १५ दिवसांच्या आत" देण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, संबंधित विभागाने "कर्मचाऱ्यांची कमतरता" हे कारण पुढे करत अर्जदारांना प्रत्यक्ष कार्यालयात येण्यास सांगितल्याने आयोगाच्या आदेशाचा अवमान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.




इंदुमती खबाले यांनी आयोगाला पाठविलेल्या ई-मेलमध्ये नमूद केले आहे की, संबंधित माहिती ही केवळ कागदपत्रांपुरती मर्यादित नसून जमिनीच्या मालकी हक्काशी संबंधित अत्यंत महत्त्वाची बाब आहे. कार्यालयीन दिरंगाईमुळे मालमत्ता हक्कांवर परिणाम होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

तसेच, माहिती अधिकार कायद्याच्या कलम १८ आणि २० अंतर्गत संबंधित अधिकाऱ्यांवर प्रतिदिन २५० रुपयांप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. आयोगाच्या आदेशाचे पालन न केल्याप्रकरणी वरिष्ठ स्तरावर स्वतंत्र तक्रार दाखल करण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात राज्य माहिती आयोगाने तातडीने ऑनलाईन सुनावणी घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याची मागणी होत आहे.

# नृसिंहवाडी येथील पोस्ट कार्यालय होणार बंद?

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

गेल्या अनेक वर्षापासून सुरू असलेले येथील पोस्ट कार्यालय आता बंद होणार आहे. सध्या पोस्ट कार्यालय असलेल्या जागामालकांनी पोस्ट खात्याला जागा सोडण्यासंदर्भात ३१ मे पर्यंतची मुदत दिली आहे.याबाबत अधिक माहिती अशी येथील श्रीमती सुप्रिया उत्तम सरदेसाई यांच्या मालकीच्या जागेत सध्या पोस्ट कार्यालय आहे. २०११ ते २०१५ असा पाच वर्षाचा भाडेकरार करण्यात आला होता यानंतर पुन्हा २०१६ ते २०२१ पुन्हा पाच वर्षाचा करार करण्यात आला आता करार संपून चार वर्षे झाले तरी पोस्ट खात्याकडून संबंधित जागा मालकास भाडेवाढ देण्यात आलेली नाही. दरम्यान श्रीमती सुप्रिया उत्तम सरदेसाई या जागामालकांनी पोस्ट खात्याला आपली जागा आमच्या ताब्यात द्यावी याबाबतचा पत्र व्यवहार पोस्ट खात्याच्या वरिष्ठ कार्यालय प्रवर अधीक्षक कोल्हापूर यांच्याकडे केला आहे.याबाबत पोस्ट खात्याने २०२१ नंतर कोणत्याही भाडेवाडीचा कराराबाबत करार झाल्या नसल्याचे पत्र संबंधित जागा मालकांना पाठवले आहे. या अनुषंगाने जागामालक श्रीमती उत्तम सरदेसाई यांनी ही जागा पुन्हा आमच्या ताब्यात ३१ मे पूर्वी द्यावी द्यावी अशी मागणी पत्राद्वारे



पोस्ट खात्याकडे केली आहे. दरम्यान पोस्ट कार्यालयाला आता जागा उपलब्ध नसल्याने हे कार्यालय आता अन्य गावी स्थलांतर होणार असल्याची चर्चा आहे. पोस्ट खात्याने येथील कार्यालयासाठी ग्रामपंचायत व दत्त देव संस्थान यांच्याकडे अर्ज मागणी केल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

> आमच्या जागेत गेल्या पंधरा वर्षापासून पोस्ट कार्यालय आहे मात्र २०२१ पासून वारंवार भाडेवाडी बाबत खात्याला कळवले असता कोणतेच उत्तर न आल्याने व आम्हाला आमची जागा कौटुंबिक कामासाठी ताब्यात पाहिजे आहे. यामुळे पोस्ट खात्याने ३१ मे पूर्वी आमची जागा आमच्या ताब्यात द्यावी याबाबत संबंधित खात्याच्या वरिष्ठांशी पत्र केला असून त्याची प्रत राष्ट्रपती, अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, ग्रामपंचायत अधिकारी नृसिंहवाडी, पोलीस अधीक्षक कार्यालय कोल्हापूर, पोलीस निरीक्षक शिरोळ पोलीस ठाणे यांना पाठवल्या आहेत. तसेच ३१ मे पर्यंत जागा ताब्यात न दिल्यास आम्ही आमच्या कंपाऊंडच्या गेटला कुलूप लावणार आहे. याचा पोस्ट खात्याने विचार करावा.
>
> **सुप्रिया सरदेसाई, पोस्ट कार्यालय जागा मालक.**

# त्रिशताब्दी जयंती वर्ष सोहळा सांगलीत संपन्न होणार

**▶▶ आर.एस.चोपडे यांची माहिती**

**म्हसवड : हॅलो प्रभात**



आर.एस.चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली महाराणी अहिल्यादेवी होळकर शिक्षण संस्थेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्ष सोहळा गुरुवार दि. २८ मे रोजी सकाळी १०.३० वाजता किड्स पॅराडाईज इंग्लिश मीडियम स्कूल, शामनगर, कुपवाड येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार असल्याची माहिती संस्थेकडून देण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रकाश महानवर, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे महापौर धीरज सूर्यवंशी, उपमहापौर गजानन मगदूम, जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार व संस्थेचे माजी विद्यार्थी गोपीचंद पडळकर तसेच धनगर साहित्य संमेलनाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अभिमन्यू टकले उपस्थित राहणार आहेत.

त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त समाजातील उच्चविद्याविभूषित तसेच प्रशासकीय सेवेत कार्यरत गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांचे 'अहिल्यादेवी होळकर यांचे लोककल्याणकारी कार्य, सद्य सामाजिक स्थिती व युवकांना मार्गदर्शन' या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे.

समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा गौरव करून नव्या पिढीला प्रेरणा देण्याचा संस्थेचा उद्देश असल्याचे चेअरमन प्राचार्य आर. एस. चोपडे यांनी सांगितले. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास समाजातील शिक्षणप्रेमी, विद्यार्थी, पालक व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रेरणादायी मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी संस्थेचे व्हा.चेअरमन एल. टी.शेंडगे, सेक्रेटरी एस. ए. पाटील, खजिनदार एस. व्ही. अनुसे, समन्वय समितीचे अध्यक्ष डी. ए. वाघमोडे, कार्यवाह बी. पी. सरगर यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक उपस्थित होते.

# इमटेक्स २०२६ मधील सहभागामुळे डीकेटीईच्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

येथील डीकेटीई इन्स्टिट्यूटच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांसाठी मशीन डिझाईन व मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात करिअर घडविण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित इमटेक्स २०२६ प्रदर्शनातील उल्लेखनीय सहभागामुळे भारतीय मशीन टूल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनतर्फे विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रमाची संधी मिळणार आहे. या अभ्यासक्रमामध्ये आधुनिक मशीन टूल्स डिझाईन, उत्पादन प्रक्रिया, ऑटोमेशन, इंडस्ट्री ४.० व स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग यांसारख्या अत्याधुनिक विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासोबतच विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील उद्योगांमध्ये इंटर्नशिप, एसपीएम




डिझाईन प्रोजेक्ट्सवर काम, तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच प्री-प्लेसमेंट प्रशिक्षणाची सुविधा मिळणार आहे.

इमटेक्स २०२६ प्रदर्शनात डीकेटीईच्या मेकॅनिकल विभागाचे दोन अभिनव प्रकल्प विशेष आकर्षण ठरले. प्रा. सुयोग रायजाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आलेल्या 'एक्झॉस्ट टू प्रिंटर इंक कन्व्हर्टर विथ स्मार्ट पीयूसी किट' या पेटंटप्राप्त प्रकल्पाला 'पॉप्युलर चॉईस अवॉर्ड' मिळाला. तसेच प्रा. गिरीष मेकळके यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित 'स्मार्ट विंडो ऑटोमेशन सिस्टीम' या प्रकल्पाचेही उद्योग क्षेत्रातून कौतुक झाले. संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे व अन्य पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# सांगली भाजपमध्ये अस्वस्थता ?

## १० नगरसेवक काँग्रेसच्या संपर्कात असल्याचा मंगेश चव्हाण यांचा दावा

**सांगली : हॅलो प्रभात**

आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सांगलीच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेतील भाजपच्या तब्बल १० विद्यमान नगरसेवकांचा काँग्रेसशी संपर्क असल्याचा दावा विरोधी पक्षनेते मंगेश चव्हाण यांनी केला आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे भाजपच्या गोटात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. महापालिकेतील विकासकामांचे नियोजन, स्वीकृत नगरसेवक पदांची निवड आणि अंतर्गत गटबाजी यावरून सत्ताधारी भाजपमध्ये नाराजी वाढत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. भाजपने विरोधी पक्षांतील काही नेत्यांना आपल्या गोटात आणण्याचे



प्रयत्न सुरू ठेवले असतानाच आता भाजपलाच आपल्या नगरसेवकांची चिंता सतावू लागल्याचे चित्र आहे. माध्यमांशी बोलताना मंगेश चव्हाण म्हणाले, "भाजपमधील चुकीच्या कारभारामुळे अनेक नगरसेवक नाराज आहेत. त्यापैकी १० प्रमुख नगरसेवक काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या संपर्कात असून, आगामी विधानपरिषद निवडणुकीत याचे परिणाम दिसून येतील. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर बदललेल्या राजकीय समीकरणांचा प्रभाव आता स्थानिक स्वराज्य संस्थांवरही दिसू लागल्याचे बोलले जात आहे. महाविकास आघाडीची ताकद सांगलीत वाढत असल्याची चर्चा रंगत असून, नाराज नगरसेवक लवकरच भूमिका स्पष्ट करतील, अशी शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, काँग्रेसच्या या दाव्याला भाजपकडून काय प्रत्युत्तर दिले जाते आणि पक्षांतर्गत नाराजी रोखण्यात भाजपला यश येते का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# स्वतःच्या आवडीचे करिअर निवडा



रविंद्र खैरे : योग्य दिशा निवडल्यास यशस्वी भविष्य घडवता येते

**तिटवे : हॅलो प्रभात**

करिअर निवडताना केवळ आजच्या संधी नव्हे तर उद्याच्या गरजा आणि स्वतःच्या आवडीनुसार निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास कोणतेही क्षेत्र उज्ज्वल भविष्य घडवू शकते, असे प्रतिपादन रविंद्र खैरे यांनी केले. शहीद महाविद्यालयाच्या वतीने राधानगरी व तारळे येथे दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करिअर मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी शहीद महाविद्यालयाच्या राधानगरी व तारळे परिसरातील प्लेसमेंट झालेल्या विद्यार्थिनीचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील करिअर संधी, आवश्यक कौशल्ये, बदलते तंत्रज्ञान व त्याचा भविष्यातील परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. "स्वतःची आवड ओळखून शिक्षणाची दिशा ठरवली, तर कामात समाधान मिळते आणि यशाची शक्यता अधिक वाढते," असेही त्यांनी नमूद केले.

शिक्षण, आर्किटेचर, डी. एम.एल.टी.,माहिती तंत्रज्ञान, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, पर्यावरण अभ्यास, मीडिया, उद्योजकता आदी क्षेत्रांमधील वाढत्या संधींबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या शंका मोकळेपणाने मांडत संवाद साधला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पालकर यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. यावेळी प्राचार्य हिमांशु चव्हाण, उपप्राचार्य सागर शेटगे, प्रा. विशालसिंह कांबळे, प्रा. मयुरी महेकर, राजेंद्र चव्हाण, विठ्ठल चव्हाण, दत्तात्रय शेटके, अवधूत कलिकत्ते, स्वप्नील कुंभार, शिक्षकवृंद तसेच दहावी-बारावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. अविनाश पालकर यांनी केले.

# 'अर्थतरंग' ग्रंथास दमसा सभेचा पुरस्कार

**सांगली : हॅलो प्रभात**

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने देण्यात येणारा सन २०२५ चा विशेष ग्रंथ पुरस्कार शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशनचे अध्यक्ष आणि सांगली येथील डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयाचे माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.संजय ठिगळे यांना जेष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.




कोल्हापूर येथील उद्यमनगर येथील शेठ रामभाई स्मृती हॉल मधे संपन्न झालेल्या ग्रंथ पुरस्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ट साहित्यिक डॉ.सुनीलकुमार लवटे होते. कार्यक्रमास डॉ.विजय चोरमोरे उपस्थित होते.

प्रा.संजय ठिगळे यांच्या अर्थतरंग पुस्तकास यापूर्वी मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आणि शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशनचा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार प्राप्त झाला आहे.

पुरस्काराबद्दल बोलताना प्रा.संजय ठिगळे म्हणाले की, सदरचा पुरस्कार म्हणजे लिहत्या हाताला बळ देणारा पुरस्कार आहे. गेली तीन दशके राष्ट्रीय सेवा योजनेच्या आणि आर्थिक साक्षरतेच्या व अलीकडच्या काळात डिजिटल साक्षरतेच्या चळवळीत कार्यरत असल्यामुळेच माझ्या हातून अर्थतरंग पुस्तक लिहिणे शक्य झाले.

कार्यक्रमास डॉ. आलोक जत्राटकर, डॉ.विनोद कांबळे, सुवर्णा ठिगळे, रविंद्र बेडकिहाळ, प्राचार्य जी.पी.माळी, नामदेव माळी उपस्थित होते.

# सेफ्टी ऑफिसर म्हणजे अनेक कुटुंबांच्या सुरक्षिततेचा रक्षक : विनायक भोसले



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

**घोडावत इन्स्टिट्यूटमध्ये इंडस्ट्रियल सेफ्टी बॅचचा निरोप समारंभ**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मान्यताप्राप्त ॲडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी (शैक्षणिक वर्ष २०२५-२६) या अभ्यासक्रमाची चाळीस विद्यार्थ्यांची बॅच यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानिमित्त संजय घोडावत इन्स्टिट्यूटमध्ये निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय घोडावत विद्यापीठाचे विश्वस्त श्री. विनायक भोसले होते. इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. विराट गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षीय भाषणात विश्वस्त, विनायक भोसले यांनी इंडस्ट्रियल सेफ्टी ऑफिसरच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "सेफ्टी ऑफिसर हा केवळ उद्योगातील कर्मचारी नसून अनेक कुटुंबांच्या सुरक्षिततेचा रक्षक असतो. उद्योगातील प्रत्येक जीव मौल्यवान आहे आणि त्यांचे संरक्षण करणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे." त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळाली. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संचालक डॉ. विराट गिरी यांनी विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील करिअरच्या संधी, शिस्त आणि जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक जीवनात सुरक्षितता संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले.

डिपार्टमेंट ऑफ शॉर्ट कोर्सेसचे विभागप्रमुख प्रा. अजय कोंगे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात वर्षभरातील विविध उपक्रमांचा आढावा घेतला. त्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाचे महत्त्व स्पष्ट करत "सुरक्षित उद्योग, समृद्ध राष्ट्र" हा संदेश सेफ्टी ऑफिसर यांना दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विद्यार्थिनी समीक्षा जोशी यांनी केले. कार्यक्रम आयोजनाची जबाबदारी ऋषिकेश केसरकर तसेच सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली.

# मंजूर रस्त्याचे काम रखडले; मक्तेदारावर कारवाईची मागणी



**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली लोकसभा मतदारसंघाचे तत्कालीन खासदार संजयकाका पाटील यांच्या निधीतून सांगली शहरातील वार्ड क्रमांक १० मधील मार्केट यार्ड कमान ते रेल्वे स्टेशन जकात नाका मार्गाच्या डांबरीकरणासाठी निधी मंजूर करण्यात आला होता. नगरसेवक जगन्नाथ ठोकळे यांच्या प्रयत्नातून हे काम मंजूर झाले होते. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांनी कार्यारंभ आदेशही दिला होता. मात्र, कामाची मुदत संपूनही अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आलेली नसल्याने नागरिकांत नाराजी व्यक्त होत आहे.

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित मक्तेदाराकडून काम सुरू करण्यात आले नसल्याचा आरोप नगरसेवक जगन्नाथ ठोकळे यांनी केला आहे. सद्यस्थितीत या मार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून वाहनचालक व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे. तसेच कामात दिरंगाई करणाऱ्या मक्तेदारावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवक जगन्नाथ ठोकळे यांनी केली आहे.

# डॉ. दिनेश देशमुख यांना 'उत्कृष्ट कार्यकर्ता'पुरस्कार प्रदान

**आटपाडी : हॅलो प्रभात**



महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या वतीने साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दिला जाणारा रत्नाकर कुलकर्णी स्मृती 'उत्कृष्ट कार्यकर्ता' पुरस्कार यंदा आटपाडी येथील डॉ. दिनेश देशमुख यांना जाहीर झाला आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १२१ व्या वर्धापनदिनानिमित्त पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या जतन व संवर्धनासाठी कार्य करणारी महाराष्ट्र साहित्य परिषद ही राज्यातील प्रतिष्ठित साहित्यसंस्था मानली जाते. परिषदेतर्फे दरवर्षी विविध साहित्यिक, कवी, लेखक व संशोधकांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात येते.

मसापच्या आटपाडी शाखेचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. दिनेश देशमुख हे वाचन-आकलन उपक्रमाचे कार्यवाह म्हणून कार्यरत आहेत. सन २०१७ पासून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाद्वारे सर्व वयोगटांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्याचे काम करण्यात येत आहे.

या उपक्रमाला साहित्यप्रेमींचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. वाचन चळवळ अधिक समृद्ध करण्यासाठी सातत्याने योगदान देत असल्याची दखल घेत महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे डॉ. दिनेश देशमुख यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### श्री सिद्धिविनायक मंदिर परिसर सुशोभीकरणाचे भूमिपूजन

**मुंबई : हॅलो प्रभात**

श्री सिद्धिविनायक मंदिरात देश विदेशातून भाविक येत असतात. भाविकांना सुलभ व कमी वेळामध्ये सिद्धिविनायकाचे दर्शन झाले पाहिजे. मंदिर परिसरात पायाभूत सुविधांची कामे करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून मंदिर परिसराचे सुशोभीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वामुळे श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराला नवे रूप मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या सुशोभीकरण पहिल्या टप्प्यातील कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजन नंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, श्री सिद्धीविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) सदानंद शंकर सरवणकर, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार प्रसाद लाड, महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, तसेच सिद्धीविनायक मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांच्यासह न्यासाचे विश्वस्त उपस्थित होते. सुशोभीकरण प्रकल्पामुळे दररोज दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक चांगल्या सुविधा आणि प्रसन्न वातावरण मिळणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.



### एकदिवसीय रमाई साहित्य संमेलनाचे ३० मे रोजी आयोजन

**पुणे : हॅलो प्रभात**

महामाता रमाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीने महामाता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त तसेच स्मारकाच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी एकदिवसीय 'रमाई साहित्य संमेलन' आयोजित करण्यात आले असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी विद्रोही कवयित्री,लेखिका, व्याख्याती,अभिनेत्री रमणी सोनवणे यांची निवड करण्यात आल्याची माहिती या संमेलनाचे मुख्य समन्वयक विठ्ठल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ॲड. नितीन घोडके, ॲड. क्षितिज खरात, संजोग कांबळे, माजी नगरसेविका लाताताई राजगुरू, श्रीमंत कोतले आदि मान्यवर उपस्थित होते. संमेलनाची अधिक माहिती देताना विठ्ठल गायकवाड म्हणाले, कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाई आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून होईल. त्यानंतर सर्वधर्म प्रतिनिधींच्या उपस्थितीत वाडिया कॉलेज शेजारील रमाई राष्ट्रीय स्मारक येथे उद्घाटन समारंभ पार पडणार आहे.



### क्रिएटिव्ह इंजिन एक्स्पोमधून उलगडणार ऑरेंज इकॉनॉमीचे भवितव्य

**पुणे : हॅलो प्रभात**

बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये आता पारंपरिक उद्योगांच्या जोडीला सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि डिजिटल कौशल्य यांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवी मेंदूतील कल्पनाशक्तीवर आधारित 'ऑरेंज इकॉनॉमी' अथवा 'क्रिएटिव्ह इकॉनॉमी' ही भारताच्या आर्थिक प्रगतीची नवी दिशा ठरत असून त्याच संकल्पनेवर आधारित 'क्रिएटिव्ह इंजिन एक्स्पो २०२६'चे आयोजन येत्या ३० आणि ३१ मे रोजी गणेश कला क्रीडा मंच,पुणे येथे करण्यात आले आहे. अशी माहिती मुख्य आयोजक सृजन कॉलेज ऑफ डिझाईन चे संस्थापक संतोष रासकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे श्रमिक पत्रकार भवन येथे झालेल्या परिषदेला आयआयसीटीचे संचालक आशिष कुलकर्णी, प्रशांत महाडीक - डायरेक्टर, शारदा बिज़नेस सोल्यूशन प्रा लि., निखिल हळ्ळी डायरेक्टर अरेना, विनीता बच्छानी - डायरेक्टर मोशन पिक्चर्स स्कूल आदी मान्यवर उपस्थित होते.

### वापरात नसलेल्या बोटींच्या पुनर्वापरासाठी प्रस्ताव सादर करा – नितेश राणे

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील वापरात नसलेल्या बोटी आणि जहाजांच्या पुनर्वापरासाठी सक्षम यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे. यामुळे पर्यावरणपूरक व्यवस्थापनास चालना मिळेलच, शिवाय स्क्रॅप प्रक्रियेतून महसूल निर्मितीचे नवीन मार्गही उपलब्ध होतील. विभागाच्या माध्यमातून या संपूर्ण प्रक्रियेचा सविस्तर अभ्यास करून प्रभावी धोरण आखण्यात येणार असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली. मंत्रालयामध्ये जहाज पुर्नावापरासंदर्भात आयोजित बैठकीत मंत्री राणे बोलत होते. यावेळी महाराष्ट्र सागरी मंडळाचे अधिकारी आणि श्री राम हरित जहाज पुनर्वापर उद्योग (युनिट-२) एलएलपीचे प्रतिनिधीं उपस्थित होते. मंत्री राणे म्हणाले, राज्यातील वापरात नसलेल्या बोटी व जहाजांच्या पुनर्वापर प्रक्रियेला गती देण्यासाठी विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. श्री राम हरित जहाज पुनर्वापर उद्योग (युनिट-२) एलएलपी यांनी राज्यातील वापरात नसलेल्या बोटी व जहाजांचा पुनर्वापर करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

# वरळी जेट्टीच्या नियोजित विकासाला गती

## जलवाहतूक आणि हेलिपॅड सुविधांवर भर – मंत्री नितेश राणे

■ मुंबईतील सागरी वाहतूक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध



**मुंबई : हॅलो प्रभात**

वरळी जेट्टीच्या नियोजित विकासासंदर्भात राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलली असून, या प्रकल्पामुळे मुंबईतील जलवाहतूक, आपत्कालीन सेवा आणि पर्यटनाला मोठी चालना मिळणार असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली. मंत्रालयात आयोजित बैठकीत वरळी जेट्टीच्या विकास आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री राणे म्हणाले, मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान बांधकाम साहित्य वाहतुकीसाठी अमरसन्स गार्डन इंटरचेंज परिसरात तसेच वरळी डेअरी परिसरात तात्पुरत्या जेट्टी उभारण्यात आल्या होत्या. आता हा प्रकल्प पूर्णत्वाकडे जात असताना या जेट्टींचा उपयोग जलवाहतूक, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, वॉटर ॲम्ब्युलन्स आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी करण्याचा विचार आहे. यासंदर्भात महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत आयआयटी, मुंबई कडून स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, अहवालानुसार अमरसन्स जेट्टी प्रवासी वाहतुकीसाठी उपयुक्त नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, वरळी डेअरी परिसरातील जेट्टीमध्ये आवश्यक संरचनात्मक बदल केल्यानंतर ती जलवाहतूक आणि वैद्यकीय आपत्कालीन सेवांसाठी वापरता येऊ शकते, असे निरीक्षण नोंदविण्यात आले.

या प्रकल्पासाठी प्री-फिजिबिलिटी रिपोर्ट, डीपीआर, पर्यावरणीय परवानग्या आणि अन्य तांत्रिक मंजुरींसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, निविदाकाराची निवडही अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, वरळी जेट्टीवर हेलिपॅड विकसित करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर इच्छुक संस्थांकडून 'एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट' मागविण्यात आले आहेत.

मंत्री नितेश राणे म्हणाले की, "मुंबईतील सागरी वाहतूक अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. वरळी जेट्टीचा विकास हा केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून, आपत्कालीन सेवा, पर्यटन आणि किनारी भागातील कनेक्टिव्हिटी वाढविण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरणार आहे."

यावेळी मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे म्हणल्या की,वरळी जेट्टीच्या विकासासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाला आवश्यक ते सर्व सहकार्य महापालिका प्रशासनाकडून देण्यात येईल.



## वैद्यकीय महाविद्यालयांच्या कामांना गती द्या : मंत्री मुश्रीफ

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये उभारण्यात येत असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांच्या बांधकामांचा आढावा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी घेतला. अलिबाग, नंदुरबार, वाशिम, अमरावती, गडचिरोली, धाराशिव, रत्नागिरी, पालघर आणि अंबरनाथ येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या कामांची सद्यस्थिती, निधी, पाणी व वीजपुरवठा तसेच कामातील अडचणींबाबत सविस्तर चर्चा यावेळी करण्यात आली. कामांना गती देत दर्जेदार वैद्यकीय सुविधा उभारण्यावर शासनाचा भर असल्याचे मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले. मंत्रालयात आयोजित बैठकीत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव धीरज कुमार आणि संबंधित अधिकारी तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, संबंधित वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. मंत्री मुश्रीफ म्हणाले की, ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय शिक्षण आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. अनेक प्रकल्पांना आशियाई विकास बँक (एडीबी), जायकायांसारख्या संस्थांकडून अर्थसहाय्य मिळत असून, कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे.

## संत सोपानदेव मंदिरात अधिक ज्येष्ठ मास सोहळा

### *अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता*



**सासवड : हॅलो प्रभात**

हिंदू संस्कृतीत पवित्र मानल्या जाणाऱ्या अधिक ज्येष्ठ मासानिमित्त सासवड येथील संत सोपानदेव मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्यात वारकरी संप्रदायाचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. विविध कीर्तनकार आणि प्रवचनकारांच्या उपस्थितीत संपन्न झालेला हा सोहळा नुकताच दहीहंडी आणि काल्याच्या कीर्तनाने विधीवत संपन्न झाला. पुरंदर तालुका श्री शिरोमणी सोपानकाका वारकरी प्रासादिक ट्रस्टच्या वतीने आयोजित या सप्ताहाचा प्रारंभ १८ तारखेला झाला. सकाळी मान्यवरांच्या हस्ते वीणा आणि संत तुकाराम गाथा पूजन करून धार्मिक विधींना सुरुवात झाली. संपूर्ण सप्ताह काळात परिसरातील वातावरण नामघोषाने दुमदुमून गेले होते. हभप आदित्य मोरे, हभप प्रकाश वेदपाठक, हभप सुमनताई वाईकर आणि हभप सीमा कापरे यांनी आपल्या प्रवचनातून भक्तीचा सुगंध पसरवला, तर हभप बबन महाराज चोरघे आणि हभप मंगेश महाराज कदम यांच्या कीर्तनाने भाविकांना मंत्रमुग्ध केले.

सप्ताहाचा समारोप बुधवारी (२० मे) अत्यंत उत्साहात झाला. पहाटे काकडा आरती आणि संत सोपानदेव समाधीची महापूजा पार पडली. जेष्ठ कीर्तनकार हभप साहेबराव महाराज पढेर (होळ मुरूम) यांच्या सुश्राव्य आवाजात काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनानंतर दहीहंडीचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर टाळ-मृदुंगाच्या गजरात मंदिर प्रदक्षिणा काढण्यात आली. शेवटी उपस्थितांना महाप्रसाद वाटप करून या सोहळ्याची सांगता करण्यात आली. अधिक ज्येष्ठ मास हा देवाच्या उपासनेसाठी अत्यंत पवित्र काळ आहे. या काळात अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून भाविकांना संतांचे विचार ऐकण्याची संधी मिळाली. सर्व वारकरी आणि भक्तांच्या सहकार्यामुळे हा सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाला, असे ॲड.त्रिगुण महाराज गोसावी यांनी सांगितले.

#### सासवडची धार्मिक परंपरा अधिक समृद्ध

**सासवड हे संत सोपानदेवांचे पावन ठिकाण असल्याने येथे वर्षभर धार्मिक कार्यक्रम सुरू असतात. मात्र, अधिक ज्येष्ठ मासाचे निमित्त साधून आयोजित या सप्ताहाने वारकरी संप्रदायातील ऐक्य आणि भक्तीचे दर्शन घडवले. या संपूर्ण कार्यक्रमात ट्रस्टचे सचिव काळूराम कड, खजिनदार शंकर म्हस्के, देवस्थानचे चोपदार सिद्धेश शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी बांधव आणि महिला भगिनींची उपस्थिती वाखाणण्याजोगी होती.**

## अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी व्यवहारिक मराठीचे धडे घ्यावे

### १५ ऑगस्टनंतर मुदतवाढ नाही — मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई : हॅलो प्रभात**



राज्यातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा सहज बोलता, समजता आणि दैनंदिन व्यवहारात प्रभावीपणे वापरता यावी यासाठी परिवहन विभागामार्फत व्यापक मराठी शिक्षण अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. या उपक्रमात रिक्षा-टॅक्सी संघटनांनी सक्रिय सहभाग घेऊन पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत राज्यातील विविध रिक्षा व टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी मराठी भाषा शिक्षण उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, चालकांना व्यवहारिक मराठी आत्मसात करता यावी यासाठी दररोज चार तासांचे ऑफलाइन प्रशिक्षण दिले जाणार आहे. मराठी संभाषण कौशल्य विकसित करण्यावर विशेष भर देण्यात येणार असून ऑनलाइन प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रशिक्षण अधिक प्रभावी आणि सुलभ व्हावे यासाठी विविध शाखा कार्यालयांमध्ये विशेष वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत. मुंबई, ठाणे, डोंबिवली, नवी मुंबई, वसई-विरार, पालघर आणि डहाणू या भागांत प्रारंभी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. तसेच कोकण मराठी साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातूनही मराठी शिकविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी सुमारे ४५०० शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यांना मानधन दिले जाणार आहे. शासनाकडून यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आल्याची माहितीही मंत्री सरनाईक यांनी दिली. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर चालकांची मौखिक परीक्षा घेण्यात येणार असून यशस्वी उमेदवारांना शासनाकडून अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय हिंदी ते मराठी भाषांतर आणि सोपे मराठी संभाषण शिकण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित ऑनलाइन ॲपची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या ॲपच्या माध्यमातून चालकांना मराठी शब्द, वाक्यरचना आणि दैनंदिन संवाद सहज शिकता येणार असून मराठी भाषेचा वापर अधिक सुलभ होणार आहे. या उपक्रमामुळे प्रवासी आणि चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत होईल तसेच मराठी भाषेचा प्रसार आणि वापर मोठ्या प्रमाणात वाढेल, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला. मराठी भाषा शिकण्यासाठी १५ ऑगस्ट २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून त्यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## जवाहर बालभवनाच्या परिसरात मुक्त विज्ञान उद्यान उभारणार

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबईच्या चर्नी रोड परिसरातील महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवनाच्या परिसरात 'मुक्त विज्ञान उद्यान' उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते बालभवनच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कौशल्य, रोजगार आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार दीपक केसरकर, मुंबईच्या महापौर रितू तावडे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण विभागाचे आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह, बालभवनच्या संचालक नीता पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. बालभवनच्या नूतन वास्तूची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महानगरपालिका शाळांमधील अधिकाधिक विद्यार्थ्यांना या केंद्राशी जोडण्यासाठी महापौर रितू तावडे यांनी पुढाकार घ्यावा. यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हातभार लागेल.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, बालभवन ही केवळ इमारत नसून लाखो मुलांच्या स्वप्नांना आकार देणारे प्रेरणास्थान आहे. नवीन वास्तूमुळे महाराष्ट्रातील बालकांच्या कल्पकतेला नवे पंख मिळतील. मुलांना बालभवनाच्या माध्यमातून खेळ, गायन, नृत्य, चित्रकला, शिल्पकला आणि विविध सृजनशील उपक्रमांद्वारे स्वतःला शोधण्याची संधी येथे मिळते; तसेच त्यांना मातीशी, रंगांशी आणि संगीताशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बालभवन गेली ७५ वर्षे सातत्याने काम करत आहे.

# राज्यात इंधनाचा मुबलक साठा; नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

## मंत्री छगन भुजबळ : भीतीपोटी काही जिल्ह्यांत पेट्रोल विक्रीत ४० टक्क्यांहून अधिक वाढ

**मुंबई : हॅलो प्रभात**



राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नसल्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले. मात्र काही भागांत अफवांमुळे नागरिकांकडून अतिरिक्त इंधन खरेदी होत असल्याने पेट्रोल-डिझेल विक्रीत लक्षणीय वाढ झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन मंत्री भुजबळ यांनी केले. मंत्रालयात आयोजित राज्यातील पेट्रोल-डिझेल वितरणाबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, राज्य शिधावाटप नियंत्रक चंद्रकांत डांगे; तसेच विविध तेल कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी मंत्री भुजबळ यांनी सांगितले की, तेल कंपन्यांनी जिल्हा व तालुका स्तरावर नागरिकांमध्ये जनजागृती करावी. राज्यात पुरेसा इंधनसाठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू आहे. त्याबाबतची माहिती नागरिकांपर्यंत सातत्याने पोहोचवावी. काही ठिकाणी किरकोळ घटनांच्या आधारे इंधनटंचाईच्या अफवा पसरवल्या जात आहेत. त्यामुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. ते रोखण्यासाठी स्थानिक प्रशासनाने आणि तेल कंपन्यांनी मोठ्याप्रमाणात होणाऱ्या खरेदीवर लक्ष ठेवून अतिरिक्त साठेबाजी रोखावी. राज्यातील जिल्हानिहाय विक्रीच्या आकडेवारीनुसार दैनंदिन विक्रीत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यात पेट्रोल विक्रीत सुमारे २३ टक्के; तर डिझेल विक्रीत तब्बल ५२ टक्के वाढ झाली आहे. अकोला येथे पेट्रोल विक्रीत ४४ टक्के, बुलढाणा येथे ४७ टक्के, जालना येथे ४९ टक्के; तर वर्धा येथे ४३ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. दरम्यान, बैठकीत एलपीजी आणि पीएनजी गॅसच्या उपलब्धता व वितरण व्यवस्थेचाही आढावा घेण्यात आला. नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

# मक्याच्या थकीत हमीभावाची रक्कम तातडीने द्या : आमदार विवेक कोल्हे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



महाराष्ट्र शासनाच्या भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत हमीभावाने खरेदी करण्यात आलेल्या मक्याची प्रलंबित रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी, अशी मागणी आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. आमदार कोल्हे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र शासनाच्या धोरणानुसार मकासाठी प्रतिक्विंटल २४०० रुपये हमीभाव निश्चित करण्यात आला आहे. राज्य सहकारी पणन महासंघामार्फत ७ मार्च २०२६ पर्यंत खरेदी करण्यात आलेल्या मक्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. मात्र ८ मार्च ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत खरेदी झालेल्या मक्याचे पैसे अद्यापही शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात एका खरेदी केंद्रावरच २२८ शेतकऱ्यांचे तब्बल १ कोटी ६२ लाख ५६ हजार ४०० रुपये प्रलंबित असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून खरीप हंगामाच्या पूर्वतयारीवर त्याचा परिणाम होत आहे. सध्या मशागतीची कामे सुरू असून बी-बियाणे, खते आणि शेती साहित्य खरेदीसाठी शेतकऱ्यांना पैशांची गरज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून मक्याची थकीत देयके तात्काळ अदा करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी आमदार कोल्हे यांनी केली आहे.

## राज्यपालांच्या पुढाकाराने मंगळवारपासून 'टीबीमुक्त मुंबई' अभियान

मुंबई : हॅलो प्रभात : महाराष्ट्र लोकभवनाच्या पुढाकाराने बृहन्मुंबई महानगरपालिका मंगळवारपासून 'टीबी मुक्त मुंबई' अभियान सुरु करीत असून अभियानाचा आरंभ राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत मंगळवारी सकाळी ११ वाजता (दि. २६ मे) धारावी व सायन येथे होणार आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी व महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या उपस्थितीत धारावी येथील एकनाथराव गायकवाड नागरी आरोग्य केंद्र येथे तसेच ११.३० वाजता सायन येथील लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय येथे अभियानाची सुरुवात करण्यात येणार आहे.

## दळणाचे दर वाढणार

**पुणे : हॅलो प्रभात**

सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा आणखी एक फटका बसणार आहे. पुणे शहर जिल्हा पीठ गिरणी मालक संघाने सोमवार (दि.१) जूनपासून दळणाच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे गृहिणींचे मासिक बजेट चांगलेच कोलमडणार आहे. आधीच गॅस, तेल आणि भाजीपाल्याच्या दराने होरपळणाऱ्या सर्वसामान्यांना आता रोजच्या भाकरीसाठीही जास्तीचे पैसे मोजावे लागणार आहेत. पीठ गिरणी मालक संघाने घेतलेल्या निर्णयानुसार सध्याचा दर ८ रुपये प्रति किलो असून, १ जूननंतर सर्वसाधारण दळण (गहू, ज्वारी इ.) १० रुपये प्रति किलो तर, डाळ, भाजणी व इतर १५ रुपये प्रतिकिलो असणार आहे. आधीच घरगुती गॅस सिलिंडर, खाद्यतेल, डाळी आणि रोजच्या भाजीपाल्याचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यात आता रोजच्या जेवणातील पोळी भाकरीसाठी दळणाचे दर वाढल्यामुळे महिन्याचे बजेट पूर्णपणे कोलमडणार आहे.

# 'करवीर हायकर्स' च्या सातजणांनी केला 'एव्हरेस्ट बेस कँप' यशस्वी

**रत्नागिरी : हॅलो प्रभात**




कोल्हापूरच्या 'करवीर हायकर्स' च्या सातजणांनी अत्यंत प्रतिकूल हवामानातील आणि खडतर अशी समुद्र सपाटीपासून ५३६४ मीटर उंचीवर पोहचत 'एव्हरेस्ट बेस कँप' मोहीम शनिवारी यशस्वी केली. रत्नागिरीचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते, त्यांच्या पत्नी डॉ. सुप्रिया यांचा यात समावेश आहे. वयाच्या २१ व्या वर्षी एव्हरेस्ट सर करणाऱ्या आणि जगातील मृत्यूचा पर्वत अशी ओळख असणाऱ्या 'अन्नपूर्णा' पर्वत सर करणाऱ्या जगातील सर्वात तरुण ठरलेल्या करवीर हायकर्सच्या कस्तुरी सावेकर यांच्या मार्गदर्शन आणि नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली.

'एव्हरेस्ट बेस कँप'साठी भगवान गौतम बुध्दांच्या जन्मभूमीत नेपाळ-काठमांडूत १५ मे रोजी उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते, चिपळूण येथील बी के वालावलकर रुरल मेडीकल कॉलेजच्या सहप्राध्यापक डॉ सुप्रिया सातपुते, मुरुम (धाराशिव) चे उद्योजक आप्पासाहेब मुंडासे, कोल्हापूरचे उद्योजक विशाल मेहता, समाज माध्यम प्रभावक पती पत्नी नुपूर आणि अक्षय मठकर दाखल झाले.

काठमांडू ते जगातील सर्वात धोकादायक ओळख असणाऱ्या लुकला विमानतळ येथून छोट्या विमानप्रवासानंतर प्रत्यक्षात 'इबीसी' कडे वाटचालीला सुरुवात झाली. लुकला ते फाकडींग ते नामचे बाजार ते तेंगबोचे ते दिंगबोचे ते लोबुचे ते गोरकक्षेप ते एव्हरेस्ट बेस कँप असा हा 'ट्रेक पूर्ण झाला. शनिवार दि २३ मे रोजी राष्ट्रीय ध्वज फडकवून आणि संविधानाची उद्देशिका प्रदर्शित करुन या यशस्वी मोहिमेची सांगता झाली.

रात्री उणे १५ अंश सेल्सिअस तर दिवसा ४ ते ६ अंश सेल्सिअस तपमान, लोबूचे ते 'इबीसी' अतिशय जीवघेणा प्रवास ठरला. प्रतिकूल, खडतर वातावरण, दुर्गम रस्ता, हाडे गोठवणारे थंड वारे मानसिक आणि शारीरिक क्षमतेची कसोटी जागोजागी घेत होते. वाटेत येणाऱ्या अशा आव्हानांना शरीर आणि मन सक्षमपणाने सामोरे जावू शकते, हे या ट्रेकवरुन या पथकाने अनुभवले. नेपाळमधील 'पीक १५ अँडव्हेंचर' चे शेखर तमांग, योगेंद्र तमांग व प्रशांत तमांग यांनी या मोहिमेत मार्गदर्शक म्हणून भूमिका निभावली.

## थोडक्यात पण महत्वाचे

### मुळा धरणातील प्रवासी बोट बंद; नवीन बोटीची मागणी

**राहुरी : हॅलो प्रभात**

मुळा धरणातील बारागाव नांदूर ते जांभळी दरम्यान चालणारी प्रवासी यांत्रिक बोट कालबाह्य झाल्याने वारंवार बंद पडत आहे. त्यामुळे वावरथ, जांभळी व जांभुळबन या गावांचा राहुरी तालुक्याशी संपर्क तुटत असून ग्रामस्थांना छोट्या होड्यांतून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. माजी खासदार प्रसाद तनपुरे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुढाकार घेऊन येथे नवीन अत्याधुनिक यांत्रिक बोट उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे. २०२१ मध्ये नवीन बोटीकरिता ९० लाखांचा निधी मंजूर झाला होता; मात्र ठेकेदाराने काम अपूर्ण ठेवले असल्याचे तनपुरे यांनी सांगितले.

### मॉक ड्रिलदरम्यान हँड ग्रेनेडचा स्फोट; चार पोलीस कर्मचारी जखमी

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**

अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या मॉक ड्रिलदरम्यान हँड ग्रेनेडचा अचानक स्फोट होऊन चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी जखमी झाल्याची गंभीर घटना घडली. या दुर्घटनेमुळे पोलीस दलासह परिसरात मोठी खळबळ उडाली. पोलीस आणि अग्निशमन दलाच्या वतीने आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी नियमित प्रात्यक्षिके आयोजित केली जातात. सोमवारी सकाळच्या सुमारास पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या मॉक ड्रिलमध्ये शस्त्रास्त्रे हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जात होते. यावेळी अचानक हँड ग्रेनेडचा जोरदार स्फोट झाला. या घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी जखमी झाले. स्फोटाच्या तीव्रतेमुळे दोन कर्मचाऱ्यांच्या हाताची करंगळी तुटल्याची माहिती समोर आली असून अन्य दोघांना किरकोळ दुखापत झाली आहे. घटनेनंतर जखमींना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या सर्वांची प्रकृती स्थिर असून डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.

### अफवांवर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले स्पष्टीकरण

**पुणे : हॅलो प्रभात**

शहरात उद्यापासून जमावबंदी लागू होणार असल्याच्या वृत्तामुळे नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली होती. सोशल मीडियावर चर्चांना ऊत आल्यानंतर 'पुन्हा लॉकडाऊन लागणार का?' अशी भीती सर्वसामान्य पुणेकरांमध्ये निर्माण झाली होती. मात्र, या सर्व चर्चांवर आता पुणे पोलिसांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, पुणे पोलिसांकडून लॉकडाऊन संदर्भात कोणताही आदेश जारी करण्यात आलेला नाही. शहरात लागू करण्यात आलेले आदेश हे केवळ सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेले प्रतिबंधात्मक आदेश आहेत. अमितेश कुमार म्हणाले, "सार्वजनिक सण-उत्सवांच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांकडून दरवर्षी प्रतिबंधात्मक आदेश काढले जातात. या आठवड्यात विविध सण-उत्सव असल्यामुळे जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. याचा लॉकडाऊन अथवा इतर कोणत्याही निर्बंधांशी काहीही संबंध नाही."

# माजी विद्यार्थी संघ कार्यकारिणीची बैठक ठरली विशेष



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघ कार्यकारिणीची बैठक वातावरणात पार पडली. बैठकीच्या प्रारंभी रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या पत्नी कै. शशिकला रावसाहेब शिंदे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या अभिनंदनाचे प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आले.

सभेत आमदार विवेक कोल्हे यांची विधानपरिषद सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. तसेच रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ॲड. भगीरथ शिंदे यांची पुन्हा व्हा. चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन प्रस्ताव संमत करण्यात आला. याशिवाय ॲड. संदीप वर्पे आणि सुरेश बोळीज यांची मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल गौरव करण्यात आला. महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. संतोष पवार यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'नारायण सुर्वे पुरस्कार' मिळाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. आगामी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये करण्याबाबत प्राथमिक नियोजनही बैठकीत करण्यात आले. बैठकीस अध्यक्ष वसंतराव देशमुख, उपाध्यक्ष दिलीप दारूणकर, सचिव प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मद्यपी कार चालकाकडून पुण्यात पोलीस कर्मचाऱ्याला धक्काबुक्की

**पुणे : हॅलो प्रभात**

मद्यपी कार चालकाने रात्रपाळीत गस्त घालणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याला धक्काबुक्की केल्याची घटना मुंढवा भागात घडली. याप्रकरणी कार चालकाविरोधात शासकीय कामात अडथळा आणणे, तसेच धक्काबुक्की केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. प्रज्वल सोमनाथ म्हस्के (वय. २७, सध्या रा. शिक्रापूर, ता. शिरुर, जि. पुणे, मूळ रा. पानमंद वस्ती, म्हस्केवाडी, जि. अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या कार चालकाचे नाव आहे. याबाबत पोलिस कर्मचारी प्रशांत नायडू यांनी मुंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ मे रोजी रात्री सव्वा दहाच्या सुमारास कार चालक म्हस्के मुंढव्यातील रेल्वे उड्डाणपुलावरून निघाला होता. लोणकर वजनकाट्याजवळ भरधाव कारने एका ट्रकला धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच रात्रपाळीत गस्त घालणारे पोलिस कर्मचारी प्रशांत नायडू तेथे गेले. कार चालकाने नायडू यांना शिवीगाळ केली. 'तुम्ही पोलिस विकले गेले आहेत. बलात्कार होतो. तुम्ही तेथे जात नाहीत. आम्हाला त्रास देता', असे सांगून नायडू यांना धक्काबुक्की केली.

# राज्यस्तरीय पेटांक्यु स्पर्धेत पुणे विभाग सर्वसाधारण विजेता



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर, राज्य पेटांक्यु असोसिएशन फॉर महाराष्ट्र आणि अहिल्यानगर पेटांक्यु असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय पेटांक्यु क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. २१ ते २३ मे दरम्यान अवतार मेहेरबाबा ट्रस्टच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत पुणे विभागाने अष्टपैलू कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. विशेष म्हणजे पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अहिल्यानगरच्या खेळाडूंनी स्पर्धेत वर्चस्व राखले. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, राज्य पेटांक्यु असोसिएशनचे महासचिव प्रदीप साखरे, सचिव मकरंद कोऱ्हाळकर, शैलेश गवळी आणि कल्पेश भागवत यांच्या उपस्थितीत झाले. तर बक्षीस वितरण समारंभ शरदचंद्र धारुरकर, कृष्णा बारगजे आणि मुक्ता बारगजे यांच्या हस्ते पार पडला. स्पर्धा सिंगल, डबल, ट्रिपल आणि शूटिंग अशा विविध प्रकारांत घेण्यात आल्या. अंतिम गुणतालिकेत पुणे विभाग प्रथम, नाशिक विभाग द्वितीय तर अमरावती विभाग तृतीय क्रमांकावर राहिला. राष्ट्रीय पंच सुभाष उंबरे आणि प्रवीण बेलदार यांनी स्पर्धा यशस्वीतेसाठी विशेष सहकार्य केले.

# समर्थ मंदिर परिसरात पालिकेचा बुलडोझर

## अतिक्रमणांवर थेट घाव : वाहतूक कोंडीवर अखेर निर्णायक कारवाई

**सातारा : हॅलो प्रभात**

समर्थ मंदिर परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीला जबाबदार ठरत असलेल्या अतिक्रमणांवर अखेर सातारा पालिकेने सोमवारी बुलडोझर फिरवत मोठी कारवाई सुरू केली. पहाटेपासूनच पालिकेचे पथक, पोलीस बंदोबस्त आणि यंत्रसामग्री परिसरात दाखल झाल्याने समर्थ मंदिर परिसर रणांगणात बदलल्याचे चित्र पाहायला मिळाले.



पालिकेने यापूर्वी अनेक वेळा नोटिसा बजावूनही संबंधित मिळकतधारकांनी अतिक्रमणे हटवण्यास टाळाटाळ केल्याने प्रशासनाने अखेर थेट कारवाईचा मार्ग स्वीकारला. 'आम्ही स्वतः काढून घेतो' अशी विनंती करत काहींनी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला, मात्र यावेळी पालिकेने कोणतीही माघार न घेता नियोजित मोहिमेला सुरुवात केली. रुंदीकरण मोहिमेसाठी अतिक्रमण विभाग, बांधकाम विभाग, शहर विकास विभाग, आरोग्य विभाग आणि विद्युत विभागाची संयुक्त फौज मैदानात उतरली होती. शहर पोलीस, शाहूपुरी पोलीस आणि वाहतूक शाखेचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

कारवाईदरम्यान इक्बाल बागवान यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने काही काळ एकच खळबळ उडाली. मात्र पोलिसांनी तत्काळ धाव घेत हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर परिसरातील वातावरण अधिकच तापले होते.

पालिकेच्या या धडक मोहिमेमुळे समर्थ मंदिर ते बोगदा मार्गावरील अनेक अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. दुपारपर्यंत बुलडोझरची मोहीम वेगात सुरू होती. सुमारे ३० मिळकतधारकांवर कारवाई होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

वाहतूक कोंडीमुळे त्रस्त नागरिकांनी पालिकेच्या कारवाईचे स्वागत केले असून "उशिरा का होईना, पण प्रशासन जागे झाले" अशा प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहेत.

# इंधन -गॅस दरवाढीच्या विरोधात 'आप'चा बैलगाडी मोर्चा

**पुणे : हॅलो प्रभात**



पेट्रोल डिझेल गॅस दरवाढी विरोधात महागाई व बेरोजगारीच्या विरोधात आज पुण्यामध्ये आम आदमी पार्टीच्या वतीने अभिनव बैलगाडी आंदोलन करण्यात आले. आम आदमी पार्टीच्या शिवाजीनगर येथील पक्ष कार्यालयापासून ते पुणे महानगरपालिका इमारतीपर्यंत हा बैलगाडी मोर्चा काढण्यात आला. यावेळी पट्रोलचे भाव कधी कमी होणार ? मेलोडी खावो, खुद जान जाओ", "डिझेलचे भाव कधी कमी होणार? मेलोडी खावो, खुद जान जाओ", "गॅसचे भाव कधी कमी होणार ? मेलोडी खावो, खुद जान जाओ", "महागाई कधी कमी होणार ? मेलोडी खावो, खुद जान जाओ" अशा घोषणांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मोदींनी संपूर्ण देशाला तयार करण्याचे मेलडी चॉकलेट दिले आहे. त्यागाचा सर्व बोजा सर्वसामान्य जनतेवर सोपवून केवळ एक दिवसाच्या साधेपणाचा आव सत्ताधाऱ्यांनी रील द्वारे आणलेला दिसला. केवळ एक दिवस बुलेट अथवा टू व्हीलर वर फिरून आणि दुसऱ्या दिवसापासून पुन्हा आहे तसा आपला लवाजमा, वाहनांचा ताफा, बडेजाव करत फिरणाऱ्या देवेंद्र फडणवीस व सत्ताधाऱ्यांनी नरेंद्र मोदी यांच्या आव्हानातील गांभीर्य काढून घेतले. दोन दिवसांची चमकोगिरी आणि पुन्हा पहिले पाढे पंचावन्न अशी परिस्थिती दिसत आहे ! 'लोका सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण' या सत्ताधाऱ्यांच्या वृत्तीला सामान्य जनता उबली आहे. सरकारी पैशाची उधळपट्टी थांबवण्यासाठी पुणे महानगरपालिकेने स्वतः पासून सुरुवात करावी अशी मागणी करत आम आदमी पार्टीने केली आहे. शासकीय उत्सवांवरील, उद्घाटने व भूमिपूजन सोहळ्यांवरील उधळपट्टी थांबवा: पुढील १ वर्ष कोणतेही अनावश्यक व भव्य शासकीय सोहळे, उद्घाटन कार्यक्रम, भूमिपूजन कार्यक्रम साजरे करणे बंद करा. ऑनलाइन पद्धतीने भूमिपूजन व उद्घाटनाचे कार्यक्रम आयोजित करा.

साधेपणाचा अवलंब: सर्व शासकीय कार्यक्रम अत्यंत साध्या पद्धतीने आणि कमीत कमी खर्चात पार पाडावेत. महापौर, नगरसेवक, वरिष्ठ अधिकारी यांच्या दालनांच्या सजावटीवर होणारा खर्च तात्काळ थांबवा. वेतन आणि पेन्शनचा त्याग: प्रधानमंत्री मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून भाजपच्या सर्व महापौर, नगरसेवक यांनी स्वेच्छेने १ वर्षासाठी आपले वेतन आणि भत्ते सोडून द्यावेत. भव्य रॅलींवर बंदी: शक्ती प्रदर्शनासाठी आणि भव्य रॅलींसाठी होणारा अवाढव्य खर्च थांबवून तो पैसा लोककल्याणासाठी वापरावा. विदेशी दौरे रद्द करा: जोपर्यंत अत्यंत आवश्यक नसेल, तोपर्यंत सरकारी खर्चाने होणारे विदेशी अभ्यास दौरे आणि मोठमोठी शिष्टमंडळे पाठवणे बंद करावे.

लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांसाठी वाहन खरेदी थांबवा आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर: पुढील १ वर्ष सर्व व्ही.आय.पी. कॉन्व्हॉय (ताफा) आणि लक्झरी सरकारी गाड्यांचा वापर थांबवावा. त्याऐवजी सार्वजनिक वाहतूक, सायकल किंवा 'कार पूलिंग'चा वापर करावा. तसेच १ वर्ष कोणत्याही नवीन सरकारी गाड्यांची खरेदी करू नये. सरकारी आस्थापनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुद्धा याचे काटेकोर पालन करावे. भ्रष्टाचारमुक्त वर्ष: किमान १ वर्ष तरी प्रशासनातून भ्रष्टाचार पूर्णपणे हद्दपार करण्याची शपथ घेऊन ती पाळावी आणि सर्वसामान्य त्रस्त नागरिकांना प्रशासकीय सेवा तात्काळ देऊन दिलासा द्यावा. भ्रष्ट अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित करण्याची कारवाई करावी. यावेळी विजय कुंभार,डॉ अभिजीत मोरे, अमित म्हस्के,मुकुंद किर्दत,रविकांत काळे, संजय कोने, सुदर्शन जगदाळे, धनंजय बेनकर , सुभाष कारंडे, सतीश यादव, ऋषिकेश कनवटे , एडवोकेट गणेश थरकुडे, विकी पासोटे, शुभम चव्हाण, ऋषिकेश मारणे व इतर उपस्थित होते.